**सुविचार**

यदि आपके संकल्प शुद्ध हैं तो जो आप सोचते हैं, वह कहना तथा जो आप कहते हैं वह करना सरल हो जाता है ।

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. ६ एप्रिल २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१४० ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# आमच्या सरकारने प्रत्येक मुस्लीम कुटुंबाला संरक्षण दिले

चुरू : काँग्रेसने जनतेसाठी काम केले नाही तर केवळ कुटुंबासाठी काम केले आहे. आम्ही सातत्याने लोकांसाठी काम करत आहोत, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. तसेच, आमच्या सरकारने प्रत्येक मुस्लीम कुटुंबाला संरक्षण दिल्याचा दावा नरेंद्र मोदी यांनी यावेळी केला. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राजस्थानच्या चुरूमध्ये शुक्रवारी नरेंद्र मोदी जनतेला संबोधित केले.



नरेंद्र मोदी म्हणाले, तिहेरी तलाकमुळे मुस्लीम मुलींच्या डोक्यावर टांगती तलवार होती. ती दूर करून प्रत्येक मुस्लीम कुटुंबाला संरक्षण दिले आहे. एका मुस्लीम कुटुंबातील वडिलांना वाटले की, त्यांनी लग्न करून आपल्या मुलीला पाठवले आहे, पण दोन ते तीन मुलांना जन्म दिल्यावर मुलीला तिहेरी तलाक देऊन परत पाठवले तर काय होईल. आई, मुलगी, भाऊ सगळेच काळजीत पडले होते. मोदींनी सर्व मुस्लिम कुटुंबांचे प्राण वाचवले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवरही हल्लाबोल करत लूट आणि घोटाळ्यांमुळे देशाची अर्थव्यवस्था कोलमडली असल्याचे सांगितले. पूर्वी सरकारमध्ये बसलेले लोक गरिबांचे पैसे खात असत. १० वर्षांपूर्वी देशात अराजकतेची परिस्थिती होती. आमच्या सरकारने ती योग्य केल्याचे नरेंद्र मोदी म्हणाले. तसेच, भाजपा प्रत्येक स्तरावर जनतेच्या पाठीशी उभा आहे. जे काम अनेक दशकांत झाले नाही ते आम्ही केले आहे. गेल्या दहा वर्षांत **(पान २ वर)**

# भाजपा अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची देवघर येथे सदिच्छा भेट



लातूर : भारतीय जनतापक्षाचे राज्याचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी देवघर येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी डॉ. अर्चनाताई पाटील, श्री. शैलेश पाटील , ॲड. रूद्राली पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. श्री. बावनकुळे चहा घेण्याच्या निमंत्रणा वरून व श्री. शिवराज पाटील चाकूरकर यांची भेट घेण्यासाठी म्हणून देवघर येथे आले होते.

या प्रसंगी ना. श्री. संजय बनसोडे, आ. बाबासाहेब पाटील, आ. संभाजीराव पाटील, आ. अभिमन्यू पवार, मकरंद सावे, व्यंकट बेद्रे, राजेश्वर बुके, ॲड. संभाजीराव बोडके, प्रा. श्री. गायकवाड, बसवराज पाटील कौळखेडकर, श्री. गणेशदादा हाके, श्री. दिलीपराव देशमूख, (अध्यक्ष भाजपा ) श्री. देविदास काळे, श्री. शिवाजीराव पाटील कव्हेकर, श्रीमती दीपाताई गिते, डॉ. बाहेती, लालासाहेब देशमूख, अमोल निडवदे, श्रीमती मीना गायकवाड, श्रीमती प्रतिभाताई पाटील कव्हेकर, श्री. अजित पाटील कव्हेकर, श्री. रंदाळे, प्रेरणा होनराव, युवराज पाटील, श्री. स्वामी, श्री. राहुल केंद्रे, ॲड. बळवंत जाधव, श्री. प्रदीप मोरे, श्री. प्रवीण पाटील, खा. सुधाकर श्रृंगारे, श्री. गुरुनाथ मगे, श्री. शैलेशपाटील, उदगीरचे हावगीस्वामी महाविद्यालयाचे सचिव श्री. उमेश पाटील.इत्यादी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# एसबीआयने लाटले सरकारकडून करोडोंचे कमिशन

नवी दिल्ली : गेल्या काही दिवसापूर्वी स्टेट बँक ऑफ इंडियाने राजकीय पक्षांना इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून मिळालेल्या देणग्यांची माहिती उघड केली. यात अनेक राजकीय पक्षांना हजारो कोटी रुपयांची देणगी मिळाल्याची माहिती समोर आली. इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून स्टेट बँक ऑफ इंडियालाही मोठा फायदा झाला आहे, बँकेला कोट्यवधी रुपये कमिशन स्वरुपात मिळाल्याची माहिती आरटीआयमधून समोर आली आहे. २०१८ ते २०२४ पर्यंत निवडणूक रोख्यांची विक्री सुमारे ३० टप्प्यांत पूर्ण झाली. या टप्प्यांमध्ये एसबीआयने विविध शुल्क आकारले आणि केंद्रीय वित्त मंत्रालयाला कमिशन म्हणून १०.६८ कोटी रुपयांचे बिल सादर केल्याचे समोर आले आहे.

इंडियन एक्सप्रेसने आरटीआयद्वारे मिळवलेल्या माहितीवरुन ही माहिती उघड झाली आहे. एसबीआयने आकारलेले शुल्क वेगवेगळ्या किंमतींचे होते. सर्वात कमी शुल्क १.८२ लाख रुपये होते. सर्वाधिक शुल्क १.२५ कोटी रुपये होते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी एकूण ४,६०७ इलेक्टोरल बाँड्स विकले, तेव्हा ९ व्या टप्प्यात ही फी लागू करण्यात आली. बँकेने शुल्क वसूल करण्यासाठी सतत वित्त मंत्रालयात पाठपुरावा केला. यासाठी फेब्रुवारी २०१९ मध्ये, तत्कालीन एसबीआयचे चेअरमन रजनीश कुमार यांनी आर्थिक व्यवहार सचिव एस सी गर्ग यांना पत्रही लिहिले होते. त्यावेळी एसबीआयला अर्थ मंत्रालयाकडून ७७.४३ लाख रुपये वसूल करायचे होते. या पत्रात एसबीआयच्या अध्यक्षांनी हे कमिशन कसे ठरवले जात आहे हेही सांगितले होते. या अंतर्गत प्रत्यक्ष संकलनावर प्रति व्यवहार ५० रुपये आणि ऑनलाइन संकलनावर प्रति व्यवहार १२ रुपये असे सांगण्यात आले. अध्यक्षांनी प्रति १०० रुपयांवर ५.५ रुपये कमिशन सांगितले होते.

कमिशनवर १८ टक्के जीएसटी

कमिशनवर १८ टक्के जीएसटी द्यावा, असे एसबीआयकडून सांगण्यात आले होते, तर बँकेने जीएसटीवर २ टक्के टीडीएस लावण्याची तक्रार मंत्रालयाकडे केली होती. ११ जून २०२० रोजी पाठवलेल्या ईमेलमध्ये, एसबीआयने ३.१२ कोटी रुपयांच्या कमिशन पेमेंटमध्ये कापून घेतलेले ६.९५ लाख रुपये परत करण्याची मागणी केली होती.

कोर्टाच्या आदेशानंतर बाँड्सची माहिती सार्वजनिक

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारची इलेक्टोरल बाँड योजना घटनाबा ठरवत रद्द केली होती. न्यायालयाने एसबीआयफला **(पान २ वर)**

# देश भीषण अवस्थेत

पुणे : अर्थव्यवस्थेची खोटी आकडेवारी, महागाई, बेरोजगारी, उद्योगांची बिकट स्थिती, देशाचे बिघडलेले सामाजिक आरोग्य, बिघडलेले राजकारण, प्रसिद्धीचा हव्यास, आदि मुद्यांवर अभ्यासपूर्ण भाष्य करत अर्थमंत्री सीतारामन यांचे पती, प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. परकला प्रभाकर यांनी देशातील भीषण वास्तव मांडले आहे.

ते पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत नव्या भारताची राजकीय अर्थव्यवस्था या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. डॉ. प्रभारक हे देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे पती आहेत. त्यामुळे त्यांची ही **(पान २ वर)**

# शरद पवार गटाची रविवारी तिसरी यादी

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीच्या दुस-या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरुन झाले तरी महाविकास आघाडीकडून अद्याप आपल्या सर्व उमेदवारांची घोषणा करण्यात आलेली नाही. ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये सांगलीच्या जागेवरुन तिढा असल्यामुळे त्यांचा निर्णय प्रलंबित आहे.



शरद पवार गटाकडूनही आतापर्यंत त्यांच्या वाट्याला आलेल्या १० पैकी सात जागांवरील उमेदवारच जाहीर करण्यात आले आहेत. मात्र, आता उर्वरित तीन उमेदवारांची घोषणाही लवकरच करण्यात येणार आहे. शरद पवार गटाकडून मिळालेल्या माहितीनुसार, येत्या रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची लोकसभा उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात येईल. यामध्ये सातारा, रावेर आणि माढा मतदारसंघातील तीन उमेदवारांच्या नावांचा समावेश असेल. यापैकी माढ्यातून धैर्यशील मोहिते पाटील, अनिकेत देशमुख आणि अभयसिंह जगताप इच्छूक असल्याची माहिती आहे. तर सातारा लोकसभेतून शशिकांत शिंदे, सुनील मानेकिंवा पृथ्वीराज चव्हाण रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. मात्र, पृथ्वीराज चव्हाण कोणत्या चिन्हावर निवडणूक लढवणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

पवारांकडून चव्हाणांना तुतारी वर लढण्याचा आग्रह

सातारा लोकसभा मतदारसंघातून पृथ्वीराज चव्हाण यांनी तुतारी या चिन्हावर निवडणूक लढवावी, असा आग्रह शरद पवार यांनी केला आहे. पुण्यात अनौपचारिक गप्पांच्या कार्यक्रमात बोलताना पवारांनी हे वक्तव्य केले. सातारा संदर्भात देखील निर्णय झाला आहे. साता-यातील जागा आम्ही सोडणार नाही. आमच्या चिन्हावर लढणार असतील तर पृथ्वीराज चव्हाण यांचा विचार होऊ शकतो, असे शरद पवार यांनी सांगितले.




**भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय श्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या उपस्थितीमध्ये भारत लिबरल एज्युकेशन संस्थेचे सचिव आमचे मित्र श्री उमेशजी पाटील यांचा आज भारतीय जनता पक्षात प्रवेश झाला याप्रसंगी लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री श्री संभाजी पाटील निलंगेकर, खासदार सुधाकरराव श्रंगारे, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, आमदार अभिमन्यू पवार, लातूर जिल्हा प्रभारी किरण पाटील, लातूर जि प चे अध्यक्ष राहुल केंद्रे हे उपस्थित होते.**

# लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिध्द

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. अशातच दिल्लीत आज काँग्रेसने आपला जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. काँग्रेस पक्षाने दिल्लीतील -AICC मुख्यालयात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला.

“GYAN’ या संकल्पनेवर काँग्रेसचा जाहीरनामा आहे. जी- गरीब, वाय -युवा, ए-अन्नदाता, एन- नारी ही काँग्रेसची संकल्पना आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात पाच महत्त्वाच्या घटकांचा समावेश केला आहे. त्यात युवा न्याय, महिला न्याय, शेतकरी न्याय, कामगार न्याय आणि समता न्याय यांचा उल्लेख आहे. आम्ही एकत्रितपणे या अन्याय काळातील अंधार दूर करू आणि भारतातील लोकांसाठी समृद्ध, न्यायाने परिपूर्ण आणि सुसंवादी भविष्याचा मार्ग प्रशस्त करू, असे काँग्रेसने म्हटले आहे.




यामध्ये २५ गॅरंटी दिल्या आहेत. शेतकरी, मजूर, युवा, रोजगार, महिला यांच्याबाबत काही आश्र्वासने देण्यात आली आहेत.

यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी अध्यक्षा सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी आज पक्ष कार्यालयातून तो प्रसिध्द केला. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्याला ‖न्याय पत्र‖ असे नाव दिले आहे. यामध्ये काँग्रेस पक्षानेही देशभर जात आधारित जनगणना करण्याचे आश्र्वासन दिले आहे.

या जाहीरनाम्याबाबत माहिती देताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, २०२४ मध्ये केंद्रात आमचे सरकार आल्यास सरकार गरीब कुटुंबातील महिलांना दरवर्षी १ लाख रुपयांची मदत करेल. त्याशिवाय शेतक-यांना कर्जमाफीचे आश्वासनही त्यांनी दिले.

# देशाचे सर्वोच्च सभागृह असलेल्या लोकसभेत अभ्यासू नेतृत्व पाठवावे

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे आवाहन

लातूर प्रतिनिधी:- भारत देशाच सर्वोच्च सभागृह असलेल्या लोकसभेत आपले प्रतिनिधित्व करण्यासाठी अभ्यासू नेतृत्व पाठवायला हवे, विना अभ्यास लोकप्रतिनिधी असल्यास काय परिणाम होतात हे आपण गेल्या काही वर्षांत पाहत आहोत. यासाठी आपण विचार करून महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना मतदान करावे, असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी पाखरसांगवी येथे आयोजित सुसंवाद बैठकीत बोलतांना केले.




लातुर लोकसभा मतदारसंघात निवडणूक प्रचार रणधुमाळीला सुरुवात झाली असून महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ शुक्रवार दि. ५ एप्रिल रोजी सायंकाळी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी डॉ. शिवाजी काळगे यांच्या समवेत लातुर विधानसभा मतदार संघातील पाखरसांगवी गावास भेट दिली.

पांखरसांगवी येथील तात्यासाहेब देशमुख यांच्या निवासस्थानी ही सुसंवाद बैठक पार पडली. या बैठकीत ग्रामस्थ, तरूण युवक, जेष्ठ नागरिक त्यांनी यांच्याशी संवाद साधला. या भेटीत पाखरसांगवी सर्कल मधील पाखरसांगवी सह खंडापुर, वासनगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान उपस्थित पाखरसांगवी ग्रामस्थांनी शेतीमाल बाजारभाव, बेरोजगार युवकांचे प्रश्न, मागील १० वर्षात विद्यमान खासदारांनी गावांसाठी काहीच कामे केली नाहीत या विषयावर ग्रामस्थांनी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या समोर विचार मांडले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, देशाच्या निवडणूका जाहीर करण्यात आल्या आहेत, या निवडणुकीत आपल्याला खासदार निवडताना पक्ष, उमेदवार, याचा विचार करावा लागतो. सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आपल्यातील उमेदवार असायला हवा आणि उच्च शिक्षित, मितभाषी, शांत, संयमी, विश्र्वास पात्र असे व्यक्तिमत्व सर्वांच्या मनातील असे डॉ. शिवाजी काळगे म्हणजे आपला माणूस, आपला उमेदवार, आपला खासदार होय.

पुढे बोलताना ते म्हणाले की, लोकसभेत आपले प्रतिनिधित्व करण्यासाठी अभ्यासू नेतृत्व पाठवायला हवे. विना अभ्यासू लोकप्रतिनिधी असल्यास काय परिणाम होतात हे **(पान २ वर)**

# लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये राजकीय पक्ष प्रतिनिधींना विविध बाबींविषयी मार्गदर्शन

## भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन करण्याचे आवाहन



लातूर, / प्रतिनिधी : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्ष, उमेदवारांनी पालन करावयाचे नियमांसह इतर आवश्यक बाबींची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणीकृत राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, निवडणूक खर्च नोंदी यासह इतर महत्वाच्या बाबींविषयी यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे आणि संगीता टकले, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे, लातूरच्य उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज असून राजकीय पक्ष, उमेदवार यांनीही भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. नामनिर्देशन पत्रे भरण्यापासून प्रचार विषयक **(पान २ वर)**

# ४०० पार च्या यादीत अव्वल नाव राहण्यासाठी चिखलीकरांना बहुमताने निवडून द्यावे

देगलूर ( प्रतिनिधी) : देशात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत मोदीजींच्या गॅरंटीवर जनतेचा कौल हा अबकी बार ४०० पार असा आहे त्या ४०० मध्ये अव्वल नाव राहण्यासाठी नांदेड लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांना पुन्हा एकदा भरघोस मताने विजयी करावे असे आवाहन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा भाजपाचे राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केले आहे . ते शहरातील नगरेश्र्वर मंगल कार्यालयात बुधवारी आयोजित केलेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर ,भाजपाचे राज्यसभा खासदार डॉक्टर अजित गोपछडे ,महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर, जहीराबाद चे भाजपाचे उमेदवार बी बी पाटील, मदनुर मंडळाचे माजी आमदार गंगाराम सौदागर ,माजी आमदार सुभाष साबणे, नांदेड लोकसभा प्रभारी व्यंकटराव पाटील गोजेगावकर, तालुका अध्यक्ष अनिल पाटील खानापूरकर , शहर अध्यक्ष प्रशांत दासरवार ,भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष नामदेव पाटील देगावकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती .

देशात गेल्या ५० _ ६० वर्षात काँग्रेसने जो विकास केला नाही ते फक्त दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी करून दाखवला आहे .आणि तो विकास अदृश्य नसून नजरेसमोर आहे. आणखीन देशाला कणखर बनवण्यासाठी पर्यायाने मोदीजींच्या हाती सत्ता देण्यासाठी नांदेड लोकसभेतून आपला शिलेदार प्रताप पाटील चिखलीकर यांना बहुमताने निवडून द्यावे असे आवाहन करीत नायगाव च्या पुढे कधी फिरकल्या नसलेल्या व हिंदी आणि इंग्रजी भाषेचं गंध नसलेल्याने सभागृहात तुमचे काय ? प्रश्र्न उपस्थित करणार असे नाव न घेता महाविकास आघाडीचे तथा काँग्रेसचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांना टोला लगावला आहे .

## जम्बो पक्षप्रवेश सोहळा

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा भाजपाचे नूतन राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून पहिल्यांदाच देगलूर मध्ये भाजपाचा जो नारा आहे अबकी बार ४0 पार ला अनुसरून आज बुधवार दि. ३ एप्रिल रोजी देगलूरातील काँग्रेस मधील स्थानिक दिग्गज पुढाऱ्यासह जवळपास ४00 कार्यकर्त्यांनी जम्बो प्रवेश करून भाजपाचा नारा सत्यतात उतरण्याचा जणू काही घाटच केल्याचे दिसून येत आहे . त्यात प्रामुख्याने काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष शंकरराव कन्तेवार राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तू अण्णा जोशी, काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष नंदू दासेटवार, काँग्रेसचे माजी उपनगराध्यक्ष बालाजी टेकाळे, काँग्रेसचे माजी नगरसेवक बाळू काब्दे , काँग्रेसचे माजी नगरसेवक अनिल बोनलावार यांच्यासह अनेक आजी-माजी नगरसेवक आणि जवळपास ४00 कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.



यावेळी माजी आमदार सुभाष साबणे, लोकसभा प्रभारी व्यंकटराव पाटील गोजेगावकर ,महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर, राज्यसभा खासदार डॉक्टर अजित गोपछडे ,भास्करराव पाटील खतगावकर आदींनी आपले मनोगत व्यक्त करून मोदीजींच्या हॅट्रिकसाठी चिखलीकरांना निवडून देण्याचे आवाहन केले आहे.

# दयानंद कला महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परीक्षा मोठ्या उत्साहात सुरू



लातूर / प्रतिनिधी- दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे दयानंद शिक्षण संस्था मा.अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, मा. सचिव रमेश बियाणी तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मा. कुलगुरु डॉ. मनोहर चास्कर आणि मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ. दिगंबर नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली उन्हाळी परीक्षा २०२४ पदवी परीक्षेस मोठ्या उत्साहाने सुरूवात झाली. दयानंद कला महाविद्यालय परीक्षा केंद्रावर एकूण १३७९२ विद्यार्थी परीक्षा देत असून सदरील विद्यार्थी महात्मा बसेश्वर महाविद्यालय लातूर, जयक्रांती महाविद्यालय लातूर, ब्रिलियंट कॉलेज, त्रिपुरा महाविद्यालय लातूर, सरस्वती संगीत महाविद्यालय लातूर, स्वामी विवेकानंद महाविद्यालय लातूर,कॉकसीट महाविद्यालय लातूर,गोविंदलाल कन्हैयालाल जोशी रात्रीचे वाणिज्य महाविद्यालय, लातूर अशा वेगवेगळ्या एकूण नऊ महाविद्यालयातून विद्यार्थी आजपासून परीक्षा देत आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर आणि केंद्रप्रमुख प्रा. डॉ.रामेश्वर खंदारे, यांच्या अचूक व सुनियोजित शिस्तबद्ध पद्धती नुसार सुरु झाल्या आहेत. तसेच सहकेंद्रप्रमुख डॉ. डी.बी. तांदुळजेकर (शिवाजी महाविद्यालय, परभणी), सहाय्यक केंद्रप्रमुख प्रा.चैतन्य शिंदे, प्रा.गजानन घायाळ व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कार्यालयीन अधीक्षक संजय तिवारी व कार्यालयीन कर्मचारी गोविंद मुंडे, हरीप्रसाद प्रयाग, गणेश पुजारी,निकीता पुणे महाविद्यालयातील सेवक धोंडीराम कोरे, रवि सुर्यवंशी,किशोर बचाटे हे सर्व विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होऊ नयेत आणि परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात संपन्न व्हावी यासाठी आतोनात मेहनत घेत आहेत.

## देगलूर मध्ये २४ जणांनी जमा केले शस्त्र

देगलूर : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यामुळे देगलूर पोलिस ठाण्यांतर्गत एकूण ३१ परवानाधारकांपैकी २४ नागरिकांनी आपले शस्त्र जमा केले असल्याची माहिती देगलूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वनाथ झुंझारे यांनी दिली.

पोलिस ठाण्यांतर्गत एकूण ३१ परवानाधारकांपैकी २४ नागरिकांनी आपले शस्त्र जमा केले आहेत तर ६ जणांकडे अत्यावश्यक बाब म्हणून शस्त्र त्यांच्याकडेच राहणार आहेत. तर एक नागरिक बाहेरगावी असल्याने त्यांनी आपले शस्त्र अद्याप जमा केले नाही ते परत आल्यावर त्यांचे शस्त्र जमा करतील असे सांगण्यात आले. जिल्हा प्रशासनाकडून शस्त्र वापरण्याचा परवाना मिळाल्यानंतर शस्त्र वापरता येते. सध्या लोकसभेची आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहिता काळात परवाना दिलेल्यांकडून शस्त्र जमा करुन घेतले जातात.



## दयानंद कला महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांचा राज्यस्तरीय 'उत्कर्ष' व 'साहसी' शिबिरात सहभाग


लातूर / प्रतिनिधी- दि. २७ ते ३१ मार्च या कालावधीत शारीरिक शिक्षण महाविद्यालय चिकलदरा येथे 'राज्यस्तरीय साहसी' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात दयानंद कला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक सौरभ पतंगे, निखिल पवार व तनुजा सोळुंके हे सहभागी झाले होते.

कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रायस्तरीय उत्कर्ष २०२४ सामाजिक व सांस्कृतिक' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये दयानंद कला महाविद्यालयातील रा.से.यो विभागातील स्वयंसेवक अर्जुन पवार स्वयंसेविका निकिता कापसे, वैष्णवी कासले, गायत्री बेडजवळगे यांचा सहभाग होता. या सर्व स्वयंसेवक आणि स्वयंसेविकांचे दयानंद शिक्षण संस्थेचे मा.अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, मा. सचिव रमेश बियाणी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड उपप्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेकक्ष डॉ.दिलीप नागरगोजे, प्रा. डॉ. पी.एस. सूर्यवंशी, कार्यालयीन अधिक्षक संजय तिवारी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.सुभाष कदम, प्रा.डॉ.सुनीता सांगोले, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. सुरेश क्षिरसागर व विध्यार्थी प्रतिनिधी अभिषेक गुरमे यांनी शुभेच्छा दिल्या.

# एमपीएससी परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलली

मुंबई : सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्र्चिती करून लवकरच सुधारित परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे. राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ मधील तरतुदीनुसार दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ पूर्वी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत, जाहिरात प्रसिद्ध होऊन अर्ज मागविण्यात आलेले असून निवड प्रक्रिया सुरु झालेली नाही, अशा प्रकरणी शासनाकडून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्चिती करून घेणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करिता दि. २९ डिसेंबर, २०२३ रोजी विविध संवर्गातील एकूण २७४ पदांकरीता जाहिरात क्रमांक ४१४/२०२३ प्रसिद्ध करण्यात आली होती. ही परीक्षा दिनांक २८ एप्रिल, २०२४ रोजी घेण्यात येणार होती. परंतु, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दि. २६ फेब्रुवारी, २०२४ अंमलात आल्याने या अधिनियमातील तरतुदी विचारात घेता आयोगाच्या दि. २१ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ तसेच दिनांक १९ मे, २०२४ रोजी नियोजित समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या परीक्षा




पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ मधील तरतुदीनुसार दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ पूर्वी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेतकिंवा जाहिरात प्रसिद्ध होऊन अर्ज मागविण्यात आलेले आहेत. तथापि, निवड प्रक्रिया सुरु झालेली नाही. अशा प्रकरणी शासनाकडून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्र्चिती करून घेणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनाकळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, २०२४ करिता शासनाच्या महसूल व वन विभाग, वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, उद्योग उर्जा व कामगार विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग इत्यादी विभागांकडून विविध गट-अ व गट-ब राजपत्रित संवर्गाकरिता प्राप्त मागणीपत्रामध्ये अराखीव पदांचा समावेश असल्याने, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण विचारात घेऊन सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या संबंधित विभागास कळविण्यात आले आहे.

सुधारित मागणीपत्र आयोगास प्राप्त होण्यास किती कालावधी लागेल याबाबत निश्र्चितता नसल्याने सध्या परिक्षेची सुधारित तारीख जाहीर करता येत नाही. प्रस्तुत परीक्षेतील सर्व संवर्गाकरिता प्रशासकीय विभागाकडून सुधारित मागणीपत्र प्राप्त झाल्यानंतर परिक्षेच्या पूर्व तयारीकरिता पुरेसा कालावधी देऊन तसेच संघ लोकसेवा आयोग व कर्मचारी चयन आयोग इत्यादींमार्फत आयोजित स्पर्धा परीक्षेचे दिनांक विचारात घेऊन परिक्षेचा सुधारित दिनांक आयोगामार्फत जाहीर करण्यात येईल.


**CHANGE IN NAME**

I have change my name from JAYASHRI SANJAY PANDE To JAISHREE SANJAY PANDE

Hence for this declaration in future.

**OLD NAME:** JAYASHRI SANJAY PANDE

**NEW NAME:** JAISHREE SANJAY PANDE

In future the same name will be used by my spouse and children

Address:- SHREE BUILDING, AUSA ROAD, DESHPANDE COLONY, LATUR, 413531,

MAHARASHTRA

Mobile No: 94230 78567

**CHANGE IN NAME**

I have change my name from PANDE SANJAYRAO BALWANTRAO To SANJAY BALWANTRAO PANDE Hence for this declaration in future.

**OLD NAME:** PANDE SANJAYRAO BALWANTRAO

**NEW NAME:** SANJAY BALWANTRAO PANDE

In future the same name will be used by my spouse and children

Address:-R 5 1 124 SHREE BANGLOE , AUSA ROAD, DESHPANDE COLONY , OPP

VISHWAMITRA HOTEL, LATUR,413512, MAHARASHTRA.

Mobile No: 94230 78567

**CHANGE IN NAME**

I have change my name from SANJEEV BALWANTRAO PANDE To SANJAY BALWANTRAO

PANDE Hence for this declaration in future.

**OLD NAME:** SANJEEV BALWANTRAO PANDE

**NEW NAME:** SANJAY BALWANTRAO PANDE

In future the same name will be used by my spouse and children

Address:- SHREE R 5 1 124, AUSA ROAD, OPP HOTEL VISHWAMITRA, LATUR, 413531,

MAHARASHTRA

Mobile No: 9423078567


पान १ वरून

### आमच्या...

कितीही काम झाले, तरी मी माझ्या भावना चुरूमध्ये व्यक्त करतो. सध्या जे काही घडले ते फक्त ट्रेलर आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

याचबरोबर, देशाला खूप पुढे न्यायचे आहे असे नरेंद्र मोदी म्हणाले. तसेच, देशात नरेंद्र मोदींच्या हमीभावाची चर्चा होत आहे. भाजपा सर्वकाही करते. आम्ही जाहीरनामा देत नाही तर संकल्प पत्र जारी करतो. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या संकल्प पत्रात दिलेली बहुतांश आश्वासने आम्ही पूर्ण केली आहेत असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

### एसबीआयने

इलेक्टोरल बाँडशी संबंधित माहिती निवडणूक आयोगाकडे देण्याचे आदेश दिले होते आणि निवडणूक आयोगाने ही माहिती आपल्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी असे सांगितले होते.

युनिक नंबर्सची माहितीही दिली

या आदेशानंतर एसबीआयने माहिती देण्यासाठी १८ जूनपर्यंत वेळ मागितला होता. मात्र, ही माहिती तातडीने द्यावी लागेल, असे न्यायालयाने एसबीआयला सांगितले होते. यानंतर एसबीआयने निवडणूक आयोगाला ही माहिती दिली होती. नंतर बँकेला कोणत्या कंपनी आणि व्यक्तीने कोणत्या राजकीय पक्षाला देणगी दिली याची माहिती देण्यासही सांगण्यात आले. नंतर बँकेने बॉण्ड्सच्या युनिक नंबर्सची माहितीही निवडणूक आयोगाला दिली. यानंतर देशभरात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले होते.

### देश भीषण...

वक्तव्य देशभरात चर्चेत आहेत. केंद्र सरकारवर गंभीर आरोप करताना डॉ. परकला प्रभाकर म्हणाले, केंद्र सरकारने सांख्यिकी जाहीर करणे बंद केले आहे. एक काळ असा होता की जगभरात भारताच्या सांख्यिकीबाबत आदर, विश्र्वास होता. आज त्यावर शंका घेतली जाते. पण सरकारला झपाट्याने विकास, प्रगती होत असल्याचे दाखवण्याची घाई झाली आहे.

दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत जगात १४३ व्या स्थानी असलेला भारत २०४७ मध्ये विकसित राष्ट्र कसा होईल, असा सवाल करत प्रभाकर यांनी मोदी सरकारची पोलखोल केली. मोदी सरकारवर घणाघात करताना डॉ. प्रभाकर म्हणाले, देशात रोजगाराची स्थिती गंभीर आहे. रेल्वेने बिगर तांत्रिक नोक-यांच्या ३५ हजार जागांची जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यासाठी १ कोटी २५ लाख तरुणांनी अर्ज केला होता. देशातील राजकीय दुर्दशा मांडताना डॉ. प्रभाकर म्हणाले, पूर्वी प्रत्येक पक्ष आम्ही धर्मनिरपेक्ष आहोत, पण त्यांच्यासारखे नाही असे म्हणायचा. पण आता प्रत्येक पक्ष आम्ही हिंदू आहोत, पण त्यांच्यासारखे नाही असे म्हणतो. हा बदल हळूहळू घडला आहे. त्यासाठी वर्षानुवर्षे अत्यंत शांतपणे, कोणत्याही प्रसिद्धिविना काम करून हा बदल घडवण्यात आला आहे, असे प्रभाकर म्हणाले.

जीवनावश्यक वस्तुंचे दर गगनाला

डाळी, भाज्या, मसाले, दूध अशा अन्नधान्याचे दर प्रचंड वाढले आहेत. देशातील महागाई, बेरोजगारी, मणिपूरमध्ये काय घडते आहे, या पेक्षा नागरिकांनी आपल्या आकांक्षा मोठ्या ठेवाव्यात असे सरकारला वाटते, असे म्हणत प्रभाकर यांनी मोदी सरकारवर टीकास्त्र सोडले.

लाखोंनी देश सोडला

डॉ. प्रभाकर म्हणाले, २०१४ मध्ये १ लाख २९ हजार भारतीयांनी देश सोडला होता, तर २०२२मध्ये २ लाख २५ हजार भारतीयांनी देश सोडला. ग्रामीण भागातील स्थिती गंभीर आहे. सरकारने उद्योगांची कर्जे निर्लेखित केली, कॉर्पोरेट कर कमी केला, उद्योगांना विनंत्या करूनही देशांतर्गत गुंतवणूक वाढलेली नाही. गेल्या आर्थिक वर्षात मनरेगासाठी केलेली तरतूद ६ महिन्यांतच संपली.

राज्यपालही अडून

डॉ. प्रभाकर म्हणाले, केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध चांगले नाहीत. केंद्र सरकारने अधिमूल्य, अधिभार लावून ४0 लाख कोटी रुपये मिळवले. राज्य सरकारने पारित केलेली विधेयके राज्यपाल मंजूर करत नाहीत. संघराज्य व्यवस्था म्हणून पंतप्रधान, राज्यांचे मुख्यमंत्री हे एक चमू म्हणून दिसत नाहीत.

मोदींना मणिपूर दिसले नाही

मोदी सरकारला टोला लगावताना डॉ. प्रभाकर म्हणाले, आताचे दिवस परिवाराचे आहेत. जी २0 मध्ये वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना होती. अवघे जग माझे घर म्हणताना आपल्याच देशातील मणिपूर आपले नाही का. वसुधैव कुटुम्बकमचा संदर्भ महोपनिषद या दुय्यम उपनिषदात आहे.संस्कृतमध्ये बोलून लोकांना सहज मूर्ख बनवता येते. संस्कृतमधील सारे काही हजार वर्षांपूर्वीचेकिंवा प्राचीन नसते. पण आता यावर विश्र्वास ठेवायला लावला जात आहे. नव्या भारताला प्राचीन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असा आरोप प्रभाकर यांनी केला.

### देशाचे...

आपण गेल्या काही वर्षांत पाहत आहोत यासाठी आपण विचार करायला हवा. येणाऱ्या काळात या भागातील फुलांची निर्यात परदेशात पाठवण्यासाठी कोल्ड स्टोरेज उभारावे लागतील, मालाची निर्यात करण्यासाठी कार्गो विमान सेवा आवश्यक आहे आणि हे सर्व व्हावे यासाठी योग्य उमेदवार आपल्याला निवडून आणावा लागेल आणि ते म्हणजे डॉ. शिवाजी काळगे होय. सामान्य कुटुंबातुन आपल्या मेहनतीने शिक्षण घेऊन लातुर पॅटर्न मुळे डॉ. शिवाजी काळगे आज गेल्या २५ वर्षपासून लातूरच्या रुग्णाला रुग्ण सेवा देत आहेत असे डॉ. शिवाजी काळगे यांची माहिती आपण प्रत्येक मतदाराला देऊन त्यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

आपण सर्वांनी एकत्र येऊन मताचे दान द्यावे :डॉ. शिवाजी काळगे

यावेळी बोलताना लातूर लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यावेळी बोलतांना म्हणाले की, लातुर लोकसभा निवडणूक करीता महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून माझी उमेदवारी जाहीर करण्यात आली, आणि आपली भेटव्हावी यासाठी ही सुसंवाद बैठक आहे. गेल्या १0 वर्षात विद्यमान सरकारने शेतीमाल भाव, रोजगार, महागाई यावर काय केले हे आपण जाणता आणि याचाच विचार करून आपण या निवडणुकीत आपल्या कामाला येणाऱ्या उमेदवाराला निवडून द्यावे, अशी विनंती त्यांनी केली. लातूरच्या सुसंस्कृत राजकारणाची परंपरा यापुढेही सतत अशीच सुरू राहावी यासाठी आपण सर्वांनी महाविकास आघाडी माध्यमातून एकत्र येऊन मताचे दान द्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी राम चामे यांनी आपले मनोगत व्यकत केले. यावेळी लातुर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष किरण जाधव, निरीक्षक सर्जेराव मोरे, समद पटेल, तालुकाध्यक्ष सुभाष घोडके, विजयकुमार साबदे, रमेश सुर्यवंशी, प्रवीण पाटील, तात्यासाहेब देशमुख, रमेश पाटील, संजय पाटील, संजय कैले, अक्षय देशमुख, सोनाली थोरमोटे, साहेबराव देशमुख, काकासाहेब देशमुख, राम चामे, बाबा पठाण यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### लातूर जिल्हाधिकारी...

नियम, निवडणूक खर्च सादर करण्याबाबतचे नियम आदी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. भारत निवडणूक आयोगामार्फत देण्यात आलेल्या निर्देशांचे आणि आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी राजकीय पक्षांच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने दिलेले निर्देश, नियमावलीबाबत मार्गदर्शन केले. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नेटके यांनी कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पालन करावयाच्या नियमांची माहिती दिली. उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे यांनी नामनिर्देशन पत्रे सादर करताना त्यासोबत द्यावयाची प्रमाणपत्रे, शपथपत्रे यासह इतर अनुषंगिक बाबींविषयी मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांनी टपाल मतपत्रिकाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची सविस्तर माहिती दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा निवडणूक खर्च संनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी अप्पासाहेब चाटे यांनी उमेदवारांनी निवडणूक खर्चाविषयी ठेवण्याच्या नोंदी आणि त्याबाबतच्या नियमांविषयी माहिती दिली.

# यशवंत धाराशिव जिल्हा

शनिवार दि. ६ एप्रिल २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## शासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल शिंदे व बिडवे यांचा सत्कार

परंडा दि.५ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य आयोगाच्यावतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत जलसंपदा विभागाच्या स्थापत्य वर्ग – २ पदी कात्राबाद येथील उषा विशाल शिंदे यांची तर हिंगणगाव येथील मनीषा मधुकर बिडवे यांची कृषी सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल कमांडो करिअर अकॅडमीच्यावतीने दोघींचा दि.५ एप्रिल रोजी सत्कार करण्यात आला.

परंडा येथील अकॅडमीच्या कॅम्पसमध्ये सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सचिव भाग्यश्री तनपुरे, मेजर महावीर तनपुरे, मधुकर बिडवे, विशाल शिंदे, शिक्षक सुशांत पवार आदी उपस्थित होते. यावेळी उषा शिंदे यांनी आपल्या आयुष्यात आलेले अडथळे व त्यावर केलेली




मात याबाबत कथन केले. तसेच आपल्या आई वडीलांनी आपल्याला दिलेली वेळ हा आपन खऱ्या अर्थाने समोर ठेवला तर आपले ध्येय निश्चित पुर्ण होते असे त्यांनी सांगितले. यावेळी मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांचे जिल्हा सरहद्दीवर जंगी स्वागत

## आ.राणाजगजितसिंह पाटील व अर्चनाताई पाटील यांच्यावर जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी

## आवाज कोणाचा, आवाज जनतेचा बोला राष्ट्रवादी पुन्हा






धाराशिव दि.५ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी प्रथमच मुंबईहून सोलापूर मार्गे उस्मानाबाद मतदार संघामध्ये प्रवेश केला. सोलापूर – धाराशिव जिल्ह्याची सरहद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तामलवाडी येथील टोलनाक्यावर दि.५ एप्रिल रोजी ५.४५ वाजण्याच्या सुमारास त्यांचे आगमन झाले. यावेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी आमदार राणा जगदीश सिंह पाटील अर्चनाताई पाटील यांच्यावर जेसीबी द्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली. तर हलगीचा दणदणात व फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

लोकसभेची आचारसंहिता लागू झाल्यापासून या मतदारसंघाचा महायुतीचा उमेदवार ठरत नव्हता. त्यामुळे महायुतीमध्ये सामील असलेल्या भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेमध्ये कोणाला उमेदवारी मिळणार यावरून प्रचंड अस्वस्थता व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. यासाठी त्यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेते मंडळींनी आपापल्या पदाधिकाऱ्यांच्या मॅरेथॉन बैठका घेऊन उमेदवार सक्षम आहे का नाही याची चाचणी केली. त्यामध्ये ही जागा नेमकी कोणत्या पक्षाला सोडायची यावरून देखील वरिष्ठ पातळीवर बरेच दिवस ताणतणाव सुरू होता. मात्र ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सुटल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडून अनेक चेहऱ्यांची चाचपणी केली मात्र पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या मर्जीतील व सक्षम असलेल्या अर्चनाताई पाटील यांना पूर्वाश्रमीच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सर्वे सर्वा जिल्ह्याचा कारभार पाहणाऱ्या आमदार राहणार सुजितसिंह पाटील यांच्या पत्नी तथा जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील यांना भाजपमधून पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश देत या मतदारसंघाची उमेदवारी त्यांना बहाल केली. ही उमेदवारी दि.४ एप्रिल रोजी मुंबई येथे अधिकृतरित्या जाहीर केली. त्यानंतर जिल्ह्यामध्ये त्यांच्या येण्याची उत्सुकता सर्वच कार्यकर्त्यांना लागून राहिली होती. आज दि.५ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता तामलवाडी टोल नाका येथे येणार असून त्यांचे स्वागत करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. त्यामुळे दुपारी ३ वाजल्यापासूनच कार्यकर्त्यांची जमवाजमव होण्यास सुरुवात झाली. यावेळी तरुण

**हलगीचा दणदणाट व फटाक्यांची आतषबाजी**

कार्यकर्त्यांसह ज्येष्ठ पदाधिकारी, महिला व युवती मोठ्या संख्येने जमा झाल्या होत्या. अर्चनाताई पाटील यांचे आगमन चारचाकी वाहनाने झाले. या वाहनाचे सारथ्य आ राणाजगजितसिंह पाटील यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी अनेकांनी औक्षण केले. तसेच पुष्पहार, पुष्पगुच्छ व बुके देऊन स्वागत केले. यावेळी राणा दादा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है...अर्चनाताई तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है... आवाज कोणाचा, आवाज जनतेचा बोला राष्ट्रवादी पुन्हा.. महायुतीचा जयघोष करण्यात आला. यावेळी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, जिल्हा संपर्क नेताजी पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष अस्मिताताई कांबळे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, नंदाताई पुनगुडे, सुनिता गुंजाळ, दत्तात्रय देवळकर, नंदकुमार गवारे, सतीश दंडनाईक, संतोष बोबडे आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवसेनेने फिरवली पाठ ?

**या स्वागत कारयक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मात्र महायुतीचा मुख्य घटक पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे) चे कार्यकर्ते व पदाधिकारी अजिबात फिरकलेच नाहीत. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे जुने व नवे कार्यकर्तेच या स्वागत समारंभ कार्यक्रमात दिसून आले. शिवसेनेने अर्चनाताई पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यापूर्वीच आपला नाराजीचा सूर आवळला असून ते नाराज असल्याचे या कार्यक्रमावरुन स्पष्टपणे दिसून आले.**

## सह्याद्री इंटरनॅशनल स्कूलचे एमटीएस, ऑलिम्पियाड परीक्षेत घवघवीत यश

धाराशिव दि.५ (प्रतिनिधी) – शहरातील सह्याद्री इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी एम.टी.एस, ऑलिम्पियाड या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले.



या परीक्षेमध्ये समर्थ सतीश येडके इयत्ता २ री या विद्यार्थ्याने राज्यात २१ वा व केंद्रात २ रे स्थान मिळवले. तर इयत्ता १ ली चे देवराज लक्ष्मण माने, ब्रॉन्झ मेडल (केंद्रात १५ वा ), अफिफा हैदर शेख ब्रॉन्झ मेडल, (केंद्रात १७ वा ), मल्हार संजय गवाड ब्रॉन्झ मेडल( केंद्रात १७ वा ), आदित्य मधुकर कोरे ब्रॉन्झ मेडल (केंद्रात १८ वा ), वेदांत श्रीकृष्ण भुतेकर ब्रॉन्झ मेडल (केंद्रात १८ वा ), शिवन्या संदीपान बेडके ब्रॉन्झ मेडल ( केंद्रात २० वा ), अरफात अकबर सय्यद ब्रॉन्झ मेडल( केंद्रात २१ वा) यांनी प्राविण्य मिळवले आहे. याबद्दल शाळेत सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री कुलस्वामिनी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ रमेश दापके, बिल गेट्स कॉलेजचे प्राचार्य डॉ अर्शद रझवी, तालुका क्रीडा अधिकारी सोलापूर सुप्रिया गाढवे, शाळेचे प्रशासकीय अधिकारी सतीश जाधव, मुख्याध्यापिका आशा इंगळे आदी उपस्थित होते.

## भाजपचे सुधीर पाटील राष्ट्रीय किसान बहुजन पक्षाकडून निवडणूक लढविणार

धाराशिव दि.५ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभा मतदार संघांमध्ये उमेदवार जाहीर होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. काल दि.५ एप्रिलपर्यंत महाविकास आघाडीचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची अधिकृतपणे उमेदवारी जाहीर करण्यात आली. मात्र महायुतीकडून दररोज नवीन चेहऱ्यांची चाचपणी केली जात होती. यामध्ये शिवसेनेकडून पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत, त्यांचे पुतणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, माजी खासदार प्रा रवींद्र गायकवाड यांची दावेदारी तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रदेश उपाध्यक्ष प्रा सुरेश बिराजदार, मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांची तसेच भाजपाकडून आमदार राणाजगजितसिंह पाटील, काँग्रेसमधून भाजपमध्ये दाखल झालेले माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, बसवराज मंगरुळे, रामदास कोळगे, अर्चनाताई पाटील, ड व्यंकटराव गुंड, ड खंडेराव चौरे, सुधीर पाटील यांच्या उमेदवारीसाठी वरिष्ठ स्तरावर नेमकी उमेदवारी कोणाला द्यायची यावरून मॅरेथॉन बैठका चालल्या. मात्र दि.४ एप्रिलपर्यंत उमेदवारी कोणाला द्यायची हे निश्चित होत नव्हते. त्यातच महायुतीकडून ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सुटल्यामुळे आणखीनच संभ्रम वाढला. मात्र पूर्वाश्रमीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या मात्र भारतीय जनता पार्टीमध्ये घरोबा केलेल्या अर्चनाताई पाटील यांना पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील करून घेत त्यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ घातली आहे. त्यामुळे पक्षांतर्गत म्हणजेच महायुती घटक पक्षांतर्गत मोठ्या प्रमाणात नाराजी खदखदू लागली आहे. खुद्द भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य सुधीर पाटील यांनी बंडखोरी करीत दुसऱ्या पक्षाचा झेंडा हाती घेतला आहे. तो पक्ष राष्ट्रीय किसान बहुजन पार्टी असून या पक्षाचे पक्षाध्यक्ष अरुण निटुरे यांनी विविध मतदार संघात आपले उमेदवार दिलेले आहेत. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात भाजपमध्ये राष्ट्रीय स्तरावर ओळख



असलेला व राष्ट्रीय स्वयं संघाशी देखील निगडित असलेला चेहरा म्हणून सुधीर पाटील यांची ओळख निर्माण झालेली आहे. मात्र त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी आपली नाराजी उघड उघड जाहीर करीत राष्ट्रीय किसान बहुजन पार्टीकडून तिकीट जाहीर केले आहे.

# परीक्षा फी भरु न शकलेल्या दोन विद्यार्थीनींना परीक्षेपासून ठेवले वंचित !

## अभिनव इंग्लिश स्कूलच्या कारभाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी

धाराशिव दि.५ (प्रतिनिधी) – इयत्ता सहावीमध्ये शिकणाऱ्या दोन विद्यार्थिनींची फीस न भरल्यामुळे शालेय व्यवस्थापनाने त्या विद्यार्थिनींना परीक्षेपासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान तर झालेच. शिवाय शारीरिक व मानसिक त्रास दिला आहे. याप्रकरणी अभिनव इंग्लिश स्कूल या शाळेवर कारवाई करावी अशी मागणी संबंधित विद्यार्थ्यांनींच्या पालकांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी व गट शिक्षण अधिकाऱ्यांकडे दि.५ एप्रिल रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, संतोष क्षीरसागर यांची मुलगी ज्ञानेश्वरी (वय– ११ वर्षे) व रविकांत शेषराव बांगर यांची मुलगी नंदिनी (वय– ११ वर्षे) या दोघीजणी अभिनय इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता ६ वी या वर्गात शिकत आहेत. सध्या त्या विद्यार्थ्यांनींचे वर्षिक परीक्षेचे पेपर चालु आहेत. पालक क्षीरसागर व बांगर यांच्या काही घरगुती अडचणीमुळे मुलींच्या शाळेची फिस भरण्यासाठी त्यांना विलंब झाला. त्यामुळे अभिनव इंग्लिश स्कूलचे मुख्यध्यापक मोदानी व श्रीमती मोदानी यांनी त्यांच्या मुलींना वार्षिक परीक्षेला बसु दिले नाही व त्यांना वार्षिक परीक्षाचा पेपर न देता दि.४ एप्रिल रोजी व पुर्वी वारंवार टेबलवर तसेच उन्हामध्ये उभे करून त्यांना मानसिक व शारीरीक त्रास देवून लहान मुलांच्या मनावर परीणाम होईल अशी अतिशय वाईट वागणुक देवुन त्यांचे शैक्षणिक नुकसान केले आहे. याबाबत पालक क्षीरसागर व बांगर यांनी विचारण्यासाठी दि.४ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास गेल्यानंतर त्यांना अरेरावीच्या भाषेत बोलून शिवीगाळ करून तुम्हाला काय करायचे ते करा ? माझे कोणी काही वाकड करू शकत नाही. तुम्हाला कुठल्या पेपरला बातमी द्यायची ती द्या तसेच तुमच्या बापाची पेंन्ड आहे काय ? तुम्ही आधी फिस भरा व नंतर बोला. नाहीतर मी तुमच्या मुलींना परीक्षाला बसू देणार नाही. त्यांना पेपर देणार नाही असेच ऊनात उभे करणार आहे असे म्हणत त्यांना धमकी दिली आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून अभिनव इंग्लिश स्कूलचे मुख्यध्यापक मोदानी व श्रीमती मोदानी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## लोकसभा निवडणूक मतदानासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

धाराशिव दि.५ (प्रतिनिधी) – लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ४० उस्मानाबाद लोकसभा मतदार संघ अंतर्गत २४२ उस्मानाबाद विभानसभामधील ४१० मतदान केंद्रावर ७० मे होणाऱ्या लोकसभा निवडणूक मतदानासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण ६ व ७ एप्रिल रोजी धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद धाराशिव व जिल्हा परिषद कन्या प्रशाला शहर पोलीस स्टेशन समोर धाराशिव येथे होणार आहे.

दि.६ एप्रिल रोजी दोन सत्रात ६९५ मतदान केंद्राध्यक्ष व ६१९ सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष यांचे प्रशिक्षण दोन सत्रात आयोजित केले आहे. प्रथम सत्रामध्ये धाराशिव नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी संस्कृतीक सभागृहात वेळ सकाळी १० ते दुपारी १ वाजता या वेळात प्रशिक्षण व दुपार सत्रात २ ते ५ वाजता जिल्हा परिषद कन्या प्रशाला शहर पोलीस स्टेशन समोर धाराशिव याठिकाणी मतदान यंत्रणा हाताळणी आणि मतदान प्रक्रिया या संबंधांचे प्रात्यक्षिक आयोजित केले आहे.

तसेच ७ एप्रिल रविवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद धाराशिव येथे सकाळी १० ते दुपारी १ वाजता या वेळात प्रशिक्षण व दुपार सत्रात २ ते ५ वाजता जिल्हा परिषद कन्या प्रशाला शहर पोलीस स्टेशन समोर धाराशिव याठिकाणी मतदान यंत्रणा हाताळणी व मतदान प्रक्रिया या संबंधांचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिक ११३० इतर मतदान अधिकारी व महिला मतदान अधिकारी यांच्यासाठी आयोजित केले आहे. त्यामुळे या प्रशिक्षण व मतदान यंत्र हाताळणी व मतदान प्रक्रिया या संबंधांचे प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक यासाठी सर्व मतदान कार्यक्रमासाठी नियुक्त कर्मचा–यांनी आदेशानुसार वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन धाराशिवचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संजय पाटील, धाराशिव तहसिलदार डॉ.मृणाल जाधव व कळंबचे तहसीलदार विजय अवधाने यांनी केले आहे.

# संपादकीय

## प्रश्न खुल्या आणि न्याय्य'चा

मणिपूरमधील हिंसाचार व महिलांवरील अत्याचार, चीनच्या घुसखोरीपुढे निरुत्तर सरकार; असे मुद्दे जनतेसमोर येऊ नयेत म्हणून विरोधी पक्ष व नेत्यांवर कारवाई केली जात आहे या आरोपांत तथ्य दिसत आहे.

लोकसभा निवडणुकीचे रण तापू लागले असले तरी या वेळची निवडणूक वेगळी आहे. केंद्रात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या विरोधी पक्षांच्या नेत्यांना अटक होणे किंवा अन्य प्रकारची कारवाई होणे या घटनांची पार्श्वभूमी यंदाच्या निवडणुकीस आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात अशी वेळ बहुधा प्रथमच आली असेल. विरोधी पक्षांच्या इंडिया' आघाडीची एक महा सभा नुकतीच नवी दिल्लीत रामलीला मैदानावर पार पडली. ही साधी निवडणूकपूर्व प्रचार सभा नव्हती. रोजगार, महागाई, सामाजिक बंधुभाव, हे मुद्दे त्यात आले नाहीत. आगामी निवडणूक हाच मुख्य मुद्दा होता. लोकशाही वाचवा', हुकुमशाही हटवा' ही या महासभेची घोषणा होती. भाजप आणि त्या पक्षाची यंत्रणा निवडणुकीचे मैदान असमान करत आहे, प्राप्तीकर खाते, अंमलबजावणी संचालनालय, केंद्रीय गुप्तचर विभाग या केंद्रीय तपास यंत्रणा भाजपच्या राजकीय व प्रचार यंत्रणेचा भाग बनल्या आहेत असा आरोप या सभेत करण्यात आला. अनेक पक्षांच्या नेत्यांनी, आपसातील राजकीय मतभेद दूर ठेवत, हाच मुद्दा जोरकसपणे मांडला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल व झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची अटक याकडे त्यांचा रोख होताच पण निवडणूक खुल्या व न्याय्य वातावरणात पार पडेल का? हा प्रश्न मुख्य होता.

### आयोगही पेचात

देशात आजवर झालेल्या अनेक निवडणुका, काही अपवाद वगळता, शांतपणे पार पडल्या आहेत. सत्ताधारी व विरोधी पक्षांनी एकमेकांवर टीका करणे हा प्रचाराचा भाग असतो; पण गेल्या आठ-नऊ वर्षांत देशातील राजकीय वातावरण कमालीचे गढूळ झाले आहे. ज्या राज्यात भाजपचे सरकार नाही ते व तेथील सत्तेतील पक्ष भ्रष्ट असल्याचा आरोप भाजप करत आहे. एवढेच नव्हे तर विरोधी पक्षांच्या नेत्यांवर कारवाई केली जात आहे. प्राप्तीकर खाते अर्थ खात्याच्या अखत्यारीत येते; मात्र सीबीआय, ईडी हे विभाग थेट गृह खात्याच्या अंतर्गत येतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा हे दोनच नेते पक्ष आणि सरकार चालवत आहेत हे गेल्या दशकभरात स्पष्ट झाले आहे. त्यामुळे विरोधी पक्षांच्या नेत्यांवर कोणाच्या सांगण्यावरून कारवाई होत आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. छापे, नोटिसा देणे, अटक अशा कारवायांमुळे संबंधित पक्षाच्या कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खचते, निवडणुकीचे मैदान असमान' बनते. भाजपला तेच हवे आहे असे वाटू लागले आहे. विरोधकांना संपवणे' हा या कारवाई मागचा हेतू आहे हेही आता स्पष्ट झाले आहे. काँग्रेसच्या आर्थिक व्यवहारांचा मुद्दा निवडणुकी पूर्वीच प्राप्तीकर खात्याने का हाती घ्यावा? भाजपच्या जमा-खर्चाचा तपशील त्यांनी का मागितला नाही? असे प्रश्न जनतेत उमटू लागल्यास ते गैर म्हणता येणार नाही. रामलीला मैदानावरील सभेत निवडणुकीवरच प्रश्न चिन्ह उमटल्याने निवडणूक आयोगातही अस्वस्थता पसरल्याचे वृत्त आहे. विरोधकांनी उपस्थित केलेल्या शंकेस कसे उत्तर द्यावे असा पेच आयोगासमोर आहे. तपास यंत्रणांनी तटस्थ' व निष्पक्षपाती' राहावे अशी सूचना देण्याचा पर्याय चाचपून पाहिला जात आहे. २०१९च्या निवडणुकीपूर्वीही तपास यंत्रणाच्या गैर वापराबद्दल विरोधकांनी तक्रार केली होती, तेव्हा अशी सूचना देण्यात आली होती. काँग्रेस विरुद्ध कोणतीही जबरदस्ती'ची कारवाई निवडणूक संपे पर्यंत केली जाणार नाही असे प्राप्तीकर खात्यास स्पष्ट करावे लागले हे येथे लक्षात घेतले पाहिजे. परंतु कायदा व न्याय यंत्रणा यांच्या कामात निवडणूक आयोग हस्तक्षेप करत आहे असे चित्र उभे राहणेही आयोगास अडचणीचे ठरेल. विरोधी पक्षांवरील तपास यंत्रणांच्या कारवाईमुळे निवडणुकीचे मैदान असमान बनू शकते असे मत तीन माजी मुख्य निवडणूक आयुक्तांनी व्यक्त केल्याचेही प्रसिद्ध झाले आहे. ही कारवाई निवडणूक पार पडेपर्यंत पुढे ढकलता येणार नाही का? अशी विचारणा आयोग करू शकतो असे त्यांचे मत आहे. निवडणूक खुल्या' व न्याय्य' वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी आयोगावर आहे. त्यात त्यांना कसे यश येते ते लवकरच दिसेल.

---

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर




## रॉबर्ट बॉईल ६०

वायुभारमापकाचा मूल सिद्धांत शोधणारे थोर शास्त्रज्ञ रॉबर्ट बॉईल यांचा जन्म २६ जानेवारी १६२७ रोजी झाला. समृद्ध वातावरणात वाढलेला रॉबर्ट बालपणापासूनच अत्यंत बुद्धिमान व असामान्य ज्ञानलालसा असलेला हुशार बालक होता. बऱ्याच भाषा अभ्यासात त्याने प्रावीण्य मिळवलेले होते. केवळ अकराव्या वर्षीच ज्ञानसाधनेसाठी अनेक ठिकाणी देशाटनास सुरुवात केल्यामुळे त्याला सत्यदर्शी विज्ञानाची गोडी लागली. अंधश्रद्धा, चमत्कार, जादूटोणा यातील फोलपणा त्याच्या लक्षात येऊन तो 'सत्य-शोधक' रॉबर्ट बनला. प्रवास-पर्व संपवून ऑक्सफोर्ड या ठिकाणी त्यांनी अभ्यासाला सुरुवात केली. तेथे पुष्कळ शास्त्रज्ञ मित्र एकत्र येऊन आपापल्या संशोधन विषयाचा सखोल अभ्यास करीत. या संस्थेचे नाव पुढे 'रॉयल सोसायटी' असे ठेवण्यात आले. रॉबर्ट बॉईल या संस्थेचे आधारस्तंभ बनले होते. त्यांनी अनेक विषयांत संशोधन केले आहे. आवाजाचा वेग निश्चित करण्याबाबत, रंगीत पदार्थ-प्रकाशाचे परावर्तन व रंगाचा आभास शिवाय स्फटिकांची अंतर्रचना आणि स्थिर विद्युतनिर्मिती व परिणाम या बाबतीत त्यांनी मोलाचे संशोधन केले. त्यांच्या काळात प्रत्यक्ष प्राणवायूचा शोध लागला नसल्याने त्यांनी मात्र एका 'अज्ञात' वायूचा अभ्यास करून ते प्राणवायूच्या शोधाच्या जवळ येऊन पोहोचले होते.

रॉबर्ट बॉईल यांनी मूलद्रव्याची व्याख्या अशी केली होती की, ज्ञात व उपलब्ध साहित्याने व प्रक्रियांनी ज्या द्रव्याचे आणखी विघटन होऊ शकत नाही असे रासायनिक घनरूप, द्रवरूप अथवा वायुरूप द्रव्य म्हणजे मूलद्रव्य होय. 'बॉईलचा – सिद्धांत' हा वायुभारावर आधारलेला पहिला महत्त्वाचा व चिरंतन सिद्धांत होय. तो थोडक्यात असा 'वायूचे आकारमान त्यावरील असलेल्या व्यस्त प्रमाणात असते' म्हणजेच दाब वाढविला असता वायूचे आकारमान कमी होते. दाब कमी झाल्यास आकारमान वृद्धी होते. हा सिद्धांत मांडण्यापूर्वी बॉईल व त्यांच्या सहकाऱ्यांनी बरेच प्रयोग केले. पुढील शास्त्रज्ञांनी विशेषतः जॅकेझ चार्लस् यांनी दाखवून दिले की, दाबात फरक करताना हवेचे म्हणजे वायूचे तपमान सारखे असले पाहिजे. कारण तपमान वाढले तर वायूचा दाब वाढतो. नंतरच्या प्रयोगांमुळे बॉईल सिद्धांतामध्ये एक कलम जोडले गेले व सर्व सिद्धांत दुरुस्तीसह प्रकाशित केला गेला. आपल्या प्रयोगाची संपूर्ण माहिती रॉबर्ट आपल्या पुतण्याला पत्राने कळवीत असत. या पत्रांचे स्वरूप पुढे इतके प्रबंधात्मक झाले की काही पत्रे शंभरहून अधिक पानांची असत. या पत्रांनी वैज्ञानिक साहित्यात मोलाची भर टाकली आहे. श्रीमंत कुटुंबात जन्मूनही बॉईल उदार व दानशूर होते. न्यूटनसारख्या जगत्विख्यात संशोधनाचा 'प्रिन्सिपिया' ग्रंथ प्रकाशात आणण्यासाठी सर्व आर्थिक जबाबदारी बॉईलनी खुशीने पार पडली. असा हा महान शास्त्रज्ञ दि. ३० डिसेंबर १६९१ रोजी निवर्तला.

---

# भक्तीचा सोपा मार्ग सांगणारे – सोपानदेव

विचारधन : प्रा. डॉ. प्राची गडकरी
संत साहित्याच्या अभ्यासक

प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालताना भक्तीच्या वाटेवर येणारे अडथळे कसे पार करायचे हे अत्यंत सुलभ भाषेत सांगणारे महाराष्ट्रातील एक थोर संत म्हणजे सोपानदेव! खरंतर त्यांच्या नावातच भक्तीचे गमक आहे. सोपा-न-देव! परंतु हा देव अत्यंत सोपा करून भक्तीचा सोप्पा मार्ग सोपानदेवांनी सांगितला आहे. सोपानदेवांच्या अभंगांची संख्या थोडी असली तरी त्यात अफाट ज्ञान साधना आहे. प्रचंड गोडी आहे भक्तीची! निवृत्तीनाथ आणि ज्ञानेश्वर माऊली पेक्षा वयाने लहान असले तरी वारकरी संप्रदायाने त्यांना काका म्हणून संबोधले आहे.

वयाच्या सातव्या वर्षी त्यांनी कृष्णाजी पंतांना विचारले होते, की लोकांनी कधी वाल्मिकी, व्यास, वशिष्ठ, गौतम, कश्यप ऋषींच्या कुळाची चौकशी केली होती का? त्यांचं कधी अडले का, जातकुळी मुळे? मग आमचच का शुध्दी पत्र हवे लोकांना? आम्ही काय अशुद्ध काम केले आहे. आम्ही शुद्धच आहोत. शुद्ध-अशुद्ध, सोवळओवळ, जातपात हे सारं माणसाने निर्माण केले आहे. देनाने नाही. म्हणुन ते म्हणतात की...

**पृथ्वी सोवळी आकाश सोवळे।**
**मन हो वोवळे अभक्तांचे।।**
**सोपान अखंड सोवळा प्रचंड।**
**न बोले वितंड हरीवीणे।।**

आपल्या पहिल्याच हरिपाठात सोपानदेवांनी हा असा सत्याचा आग्रह धरलेला आहे. एरवी शांत असलेले सोपानदेव आपले दोन्ही थोरले भाऊ म्हणजे निवृत्तीनाथ आणि माऊलींचे भिक्षेवरून दुःखी दिसले तेव्हा सोपानदेवांनी स्पष्ट शब्दात आपल मत मांडले, की दुःखी व्हायचे कारणच काय? ह्या अशा अपमानाची सवय आपल्याला झालीच पाहिजे. रोज उठून आपण लोकांनी केलेल्या अपमानावर रडत बसलो तर आपले कार्य पूर्णच होणार नाही. आपण जर वादळाला तोंड द्यायचे ठरवले आहे, तर घाबरायचे कुणाला?...

माधुकरीवरच आपले जगणे आहे मग स्थितप्रज्ञता असलीच पाहिजे अंगात! ह्या समस्येचे निवारण करताना त्यांनी ज्ञानेश्वरांना नदीचे उदाहरण दिले आहे. सोपानदेव म्हणतात की नदी वरुन खळखळत असते पण तुम्ही आत उतरल्यावर कळतं तो खळखळाट वरवरचा आहे. आत ती संथ वाहत असते. काठाला तिचा जोर वेगळा वाटतो. मध्यावर वेगळा वाटतो. हे वेगळेपण आपण स्विकारलेच पाहिजे. त्यावेळी साक्षात ज्ञानमाऊली सुध्दा गंभीर होऊन सोपानदेवांचे म्हणणे ऐकत होती. त्यांच्या आत्मबोधाच निवृत्तीनाथांनी आपल्या अभंगात कौतुक केले आहे. **सोपान**



**म्हणे गुफसी सर्वथा।**
**मग नव्हे उत्तथा भक्ती पंथ।।**
**उघडली दृष्टी इंद्रिया सकट।**
**वैकुंठाची वाट पंढरी जाण।।**

अत्यंत लहान वयातच वैराग्य आणि विरक्ती वाटत होती सोपानदेवांना म्हणूनच त्यांनी आपण समाधी घेऊन जगाचा निरोप घेऊ ही भावना आपल्या दोन मोठ्या भावंडांना बोलून दाखवली. केवळ ज्ञानेश्वरांसाठी जणू ते थांबले होते. कारण माऊलींच्या नंतर महिन्याभरात त्यांनी सासवड येथे समाधी घेतली. सोपानदेवांच्या मनाची अध्यात्मिक मशागत पाहून ज्ञानेश्वर खूश झाले होते.

विठ्ठला बरोबर रामाचे गुणगान गाताना सोपानदेव म्हणायचे की ज्या देशात रामकथा चालते तो देश आणि दिवस धन्य आहे.

चित्रगुप्त म्हणती यमा।
काय करावे गा धर्मा।।
लोक रातले रामनाम।
पुरुषोत्तमा विठ्ठलदेवा।।

सोपानदेव म्हणायचे आमचे पूर्वजन्मीचे संचित म्हणून आम्ही रामनामामृताच्या प्राप्तीचे धनी झालो आहोत.

काही रामावरील रचना त्यांनी हिंदीमध्ये सुध्दा केल्या आहेत. ज्या रचनांची भूल चक्क नामदेवांना सुध्दा पडली होती. जनाबाईंचा ज्ञानेश्वरांपेक्षा सोपानदेवांवर अधिक जीव होता. पुढच्या जन्मी आमच्या पोटी सोपानदेव यावे अशी त्यांनी विठ्ठलाला विनंती सुध्दा केली आहे.

रोज चिलिया बाळाची गोष्ट आईकडून ऐकणाऱ्या मुक्ताबाई जेव्हा एक दिवस हीच गोष्ट सोपानदेवांकडून ऐकतात तेव्हा जीवनातील कैक कटू सत्यांचा त्यांना उलगडा झालेला आहे. आई जेव्हा मुलांना मारते किंवा ओरडते तेव्हा तिचा त्यात कणभरही स्वार्थ नसतो. आपल्या मुलांच्या सुखासाठी आई कोणत्याही थराला जाऊ शकते. आणि जेव्हा मुलांना दुःख होते तेव्हा त्याच्या चौपट दुःख आईच्या मनाला झालेले असते. ह्या सोपानदेवांनी दिलेल्या ज्ञानामुळेच मुक्ताबाई आई वडील गेल्यावरही खंबीरपणे तीन भावंडांच्या पाठी सावली सारख्या उभ्या होत्या. परकरपोलक्यातल्या मुक्ताबाई आईचे जुनेर नेसून भावंडा समोर आल्या आणि आई नसली तरी काय झाले मी आहे ना! मी रांधते खिचडी असे म्हणतात तेव्हा त्यांच्यातील आत्मविश्वासाला सोपानदेवांनी दृढ केले होते. असे त्या अभिमानाने सांगतात.सोपानदेव मुक्ताबाईंच्या सोबत जास्त रहायचे. ज्ञानदेव जेव्हा गीतेचे सार काढून, प्राकृत भाषेत भाषांतर करीत होते, तेव्हा त्यांच्या लिखाण आणि टिपणे काढण्याचे काम सोपानदेव करीत होते.

**आवडीचे मागे प्रवृत्तीचे नेद्ये।।**
**नामा मार्गे वगळे निघे राया।।**

विसोबा खेचरांना कोणी ज्ञानेश्वरांचे शिष्य म्हटले तर कोणी मुक्ताबाईंचे शिष्य म्हटले आहे.परंतु स्वतः विसोबा खेचरांनी अभंगात म्हंटले आहे की...

माझी मूळ पिटीका सोपान सद्गुरू।
तेणे माथा चरणी ठेवियेला।।
चांगदेवा अंगिकार मुक्ताईने केला।
सोपान वोळला मजवरी।।

पैठण जवळील मुंगी या गावचे रहाणारे हे विसोबा चाटी यांनी सोपानदेवांना गुरू मानले होते. सोपानदेवांच्या मुखातून बाहेर पडणारा प्रत्येक विचार ते हवरटा सारखा वेचत होते. म्हणुन मुक्ताबाई विसोबा चाटी यांना खेचर बोलल्या. परंतु विसोबांनी पुढील संपूर्ण आयुष्य आपलं नाव विसोबा खेचर असेच प्रसिद्ध केले. सोपानदेवांच्या अभंगाचे मर्म सांगताना कृष्णा गुरब म्हणतात की मेंदूवरील क्षुद्र विचारांचा थर सुध्दा हे अभंग वाचून विरघळून जातो. आपल्या सोपानदेवी ग्रंथात त्यांनी गीतेवर गद्य लिखाण केले आहे. जे अत्यंत मार्मिक असून अंतर्मुख करणारे आहे. चार्वाकांनी सांगितलेल्या विचारांवर सोपानदेव चिकित्सा करायला लावतात. प्रत्येकाचा अनुभव हा वेगळा असतो आणि मनुष्य आपल्याला आलेला अनुभव उराशी बाळगून वागतो.त्याच्याकडे अचिंत्य जगाला पहायची दृष्टी नसते. ही दृष्टी आपल्या पंचीकरण, प्राकृतगीतेमध्ये त्यांनी मांडली आहे.

मना अर्धी मुंडीं वासनेतें दंडी।
विठ्ठल ब्राह्मांडीं एक आहे।।
दुजेपणी ठाव द्वैत ते फोडीले।
अद्वैत बिंबले तेजोमय।।

आपल्या गूढ वाणीने सोपानदेवांनी गीते मधील तत्वज्ञान सहज सुंदर पध्दतीने आणि स्पष्टपणे समाजापुढे मांडले आहे. मुक्ताबाईंच्या अनेक गंभीर प्रश्नांची उत्तरे सोपानदेवांनी अत्यंत सहजपणे दिली आहेत.जीवनाचा मार्ग सोपा होण्याचा एक उपाय म्हणजे नामस्मरण असे म्हणत सोपानदेवांनी वयाच्या अवघ्या वीसाव्यावर्षी सासवड येथे समाधी घेतली.

---

### (गुरु वचन)

## आई-वडिलांना विसरू नका

खूप छान गोष्ट आहे. मुलगा आणि वडिलांच्या नात्याची. हल्ली आई-बाप मुलांना जड झाले आहेत. त्यांना वृद्धाश्रमात धाडले जात आहे. यावरच ही कथा आहे.

एकदा एक वयोवृद्ध बाप आपल्या उच्च शिक्षित मुलासोबत घराच्या छतावरती बसला होता. तेथे एक कावळा आला. मुलाला बापाने विचारले, ते काय आहे? मुलगा म्हणाला कावळा. पुन्हा दुसऱ्यांदा बापाने विचारले, ते काय आहे? मुलाने पुन्हा उत्तर दिले कावळा.

तिसऱ्यांदाही बापाने विचारले ते काय आहे? मुलने जरासे दात-ओठ खात म्हटले, कावळा. मग ते दोघे घरात गेले. त्याला पुन्हा बापाने विचारले ते आत्ता आले होते ते काय होते? मुलाचा संयम सुटला होता त्याने ओरडत सांगितले, समजत नाही का? कावळा...... कावळा... कावळा.

पाचव्यांदा बापाने विचारले ते आपण पाहिले ते काय होते? मुलगा आता मात्र जाम भडकला त्याने त्यांना सांगितले, का टाईमपास करताय? तुम्हाला कितीदा सांगितले तो कावळा होता म्हणून, तरी तुम्हाला समजत नाही का? का जाणून- बुजून त्रास देताय?

मग त्या वयोवृद्ध बापाने त्या मुलाला घरातील एक डायरी आणायला सांगितली. त्याने ती आणली, त्यात हीच कथा लिहिली होती.

परंतु, ती थोडी वेगळी होती. त्या बापाच्या जागी एक लहान मुलगा होता. त्याने बापाला एक-दोन नाही तर तब्बल २५ वेळा हाच प्रश्न केला होता, आणि तितक्याच वेळा त्याच्या वडिलांनी त्याच्या प्रश्नाला हसत हसत उत्तर दिले.


त्यांना त्याच्या विचारण्याचा मुळीच राग येत नव्हता, उलट त्यांना त्या मुलाचा निरागस स्वभाव आणि त्याचे ते विचारणे आवडत होते. तो बाप त्या मुलाचाच होता जो त्याला केवळ पाच वेळा विचारल्यावर त्यांच्यावर खेकसला.

फरक फक्त हाच, की मुलासाठी बापाने केलेले कष्ट, त्यांनी सहन केलेल्या सर्व वेदना तो विसरला होता. उलट त्याने वडिलांना केवळ दुःखच दिले. लक्षात ठेवा. तुमच्या आई-वडिलांनी तुमच्यासाठी कितीतरी कष्ट केले आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी केवळ दुःखच देत आहात? आई-वडिलांना विसरू नका. त्यांनी केलेल्या कष्टांना विसरू नका.



---

## राशी भविष्य



५ एप्रिल २०२४ (पीएसआय)

मेष: शुभ रंग:लाल, शुभ दिशा :उत्तर
कोणाशी वादविवाद करणे किंवा कोणाच्या अतिआहारी जाणे टाळायला हवे. मुलांचे नवीन प्रश्न उद्भवतील.

वृषभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
कामात केलेल्या सुधारणा आणि नव्या योजना कार्यान्वित करण्यास केलेली जमवाजमव यांचा फायदा पुढे होईल.

मिथुन : शुभ रंग: पिवळा: शुभ दिशा: पूर्व
महिलांनी कौटुंबिक छोट्याशा कारणांमुळे मूड घालवून बसू नका. कामाचे श्रेय न मिळाल्यानेही वाईट वाटेल.

कर्क : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व
बौद्धिक क्षेत्रात चांगले नाव करता येईल. आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या मनाप्रमाणे व्यवहार होतील.

सिंह : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
मित्र-मैत्रिणीचा किंवा घरातील सदस्यांचा जीवनातला महत्त्वाचा प्रसंग साजरा कराल.

कन्या :शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
आर्थिक व्यवहारात जातीने लक्ष घालणे आवश्यक. वडिलधाऱ्यांची सेवा करावी लागण्याची शक्यता.

तुळ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम
आपले हितसंबंध जपण्यासाठी एखाद्याच्या कार्यक्रमात जाऊन हजेरी लावावी लागेल.

वृश्चिक : शुभ रंग :जांभळा,शुभ दिशा:दक्षिण
नोकरी-व्यवसायात सध्या पावले उचलणे आवश्यक. कोठेही वादाची ठिणगी पडू देऊ नका.

धनु : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम
युवकांनी कोणत्याही प्रलोभनापासून दूर राहिलेले बरे. महिलांनी कुटुंबात शब्दाने शब्द वाढतो हे लक्षात ठेवा.

मकर : शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: उत्तर
संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. धार्मिक विधी केल्यामुळे आनंद मिळेल.

कुंभ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या घटना घडतील. नशिबाची साथ मोठ्या प्रमाणात मिळेल.

मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
नोकरी-व्यवसायात अनेक संधी मिळणार आहेत. गोड बोलून कार्यभाग साधलेला बरा.

०५ एप्रिलला जन्मलेल्या लोकांचा भविष्य
स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर बुध व मंगळाचा प्रभाव आहे. तुम्हाला तल्लख बुध्दिमत्तेची देणगी लाभलेली आहे. तुमची आकलन शक्ती सूक्ष्म आहे. शब्द व अंक या दोन्हीवर तुमचे सारखेच प्रभुत्व आहे. तुमचे बरेचसे निर्णय भावनेपेक्षा बुध्दीने साधकबाधक विचार करून घेतलेले असतात. एखादी गोष्ट तर्काला पटल्याखेरीज तुम्ही तिचा स्वीकार करू शकत नाही. तुमची बुध्दि अनेक विषयात स्वैर संचार करते. प्रवास, नव्या आेळखींची तुम्हाला आवड असते. शरीरसुखापेक्षा बौध्दिक आनंदात, कलास्वादात तुम्ही रमता.
अनेक विषयांचे जुजबी ज्ञान करून घेण्यापेक्षा एकाच विषयावर लक्ष्य केंद्रित करून व्यासंग वाढवा. खोटे बोलणे, अतिस्पष्टवक्तेपणा टाळा. आपल्या वाणीने मने दुखावू नका. मस्तिष्कदाह, मज्जातंतूचे विकार तुम्हाला चटकन होऊ शकतात. अति बौध्दिक श्रम टाळा. बी जीवनसत्व आवश्यक.

कार्यक्षेत्र : भाषाप्रभुत्व अंगी असल्याने वाङ्:मय, पत्रकारिता, नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिकांचे लेखन यांत तुम्ही कर्तबगारी गाजवू शकाल. जाहिरातक्षेत्रातही तुमच्या शब्दप्रभुत्वाचा उपयोग होईल. बँका, खाजगी कंपन्या, महापालिका मध्ये हिशोबतपासनीस, करसल्लागार म्हणून तुम्ही महत्वाची भूमिका बजावाल. नव्या उत्पादनांच्या एजन्सी, दूरसंचार सामग्रीचे वितरण ही क्षेत्रेही नोकरीला वा स्वतंत्र व्यवसायास तुम्हाला अनुकूल ठरतील.

प्रणयी जीवन : आपल्या जोडीदाराचा विचार करतांना त्यांच्या सौंदर्यापेक्षा त्याच्या वाचनाला, बौध्दिक पातळीला तुम्ही महत्व देता. शरीरसुखाच्या मागे धावणाऱ्या व्यक्ती तुम्हाला आवडत नाहीत. केवळ पैसा हे ध्येय ठेवणाऱ्या व्यक्तींशीही तुमची दिर्घकाळ मैत्री होऊ शकत नाही. यादृष्टीने ऑगस्ट २२ ते सप्टेंबर २२ दरम्यान जन्मलेल्या व्यक्तींशी तुमचे सुर चांगल्या प्रकारे जुळतील.

वर्षफळ : व्यावसायिक गुंतवणूक प्रमाणाबाहेर नको. उधार उसनवारीची प्रवृत्ती टाळा. फेब्रुवारी मार्च मध्ये कुटुंबापासून दूर रहावे लागेल. एप्रिल मे मध्ये काही धोरणांची पुनर्रचना झाल्याने आधी आखलेल्या कार्यक्षेत्रात फेरफार करावे लागतील. जून जुलै मध्ये संततीला नोकरीच्या संधी येतील. मंगलकार्यांना चालना मिळेल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये इस्टेटीच्या प्रकरणाचा निकाल तुमच्या बाजूने लागेल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये कला क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवाल.

महत्वाचे वर्ष : ५, १४, २३, ३२, ४१, ५०, ५९, ६८, ७७.
भाग्यरत्न : पाचू
याच तारेखेची व्यक्ती : बाबू जगजीवनराम, शांताबाई किर्लोस्कर

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




## करिश्मा-रवीनाशी जोडले नाव, पहिला चित्रपट झाला हिट...

मुंबई-बॉलिवूडमध्ये असे काहीच कलाकार आहेत ज्यांनी एकामागे एक हिट चित्रपट दिलेत. त्यापैकी एक हा अभिनेता अजय देवगण आहे. अजयने गेल्या अनेक वर्षापासून बॉक्स ऑफिसवर सुपरहिट चित्रपट दिलेत. अजयच्या कामाप्रमाणेच त्याचे खासगी आयुष्य हे तितकंच चर्चेत असते. त्याचे कारण म्हणजे अजयचे नाव इतर अनेक अभिनेत्रींसोबत जोडण्यात येते. आज अजय देवगण हा त्याचा ५४ वा वाढदिवस साजरा करत आहे. याच निमित्ताने आज त्याच्या खासगी आयुष्याविषयी काही खास गोष्टी जाणून घेऊया.

अजय देवगण आणि काजोल हे आनंदी आयुष्य जगत आहेत. ते दोघे अनेकदा एकमेकांचे फोटो आणि व्हिडीओ शेअर करताना दिसतात. त्यांच्या पोस्ट या नेहमीच चर्चेचा विषय ठरतात. पण एक काळ असा होता जेव्हा अजय चर्चेत असण्याचं कारण त्याच्यासोबत काम करणाऱ्या अभिनेत्री होत्या. मीडियामध्ये त्याच्या विषयी अनेक चर्चा सुरु होत्या. अजय देवगणचे नाव हे रवीना टंडन आणि करिश्मा कपूरसोबत जोडण्यात आले होते. सगळ्यात आधी तो रवीनासोबत रिलेशनशिपमध्ये होता अशी चर्चा होती. तर त्यानंतर तो करिशअमा कपूरसोबत रिलेशनशिपमध्ये होता अशी चर्चा सुरु झाली. असे म्हटले जातं की करिश्मा आणि अजय देवगणची जवळीक पाहता अजय आणि रवीनाचा ब्रेकअप झाला होता. त्याशिवाय अजय देवगणचं नाव तब्बू आणि मनीषा कोयरालाशी देखील जोडण्यात आले होते.अजय देवगन आणि काजोलने काही वर्ष रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर १९९९ मध्ये लग्न केले. त्यानंतर ते आनंदी आयुष्य जगत होते अशात अजय आणि कंगना रणौतच्या रिलेशनशिपच्या चर्चा सुरु झाल्या. त्याचा देखील त्या दोघांच्या नात्यावर परिणाम झाल्याचे म्हटले जाते. वन्स अपॉन ए टाइम इन मुंबईच्या शूटिंग दरम्यान, कंगना आणि अजयमध्ये जवळीक निर्माण झाल्याचे म्हटले जाते.अजय देवगनच्या करिअरविषयी बोलायचे झाले तर त्याने १९९१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'फूल और कांटे' या चित्रपटातून करिअरची सुरुवात केली. त्याचा हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. आजही त्याचा मोटरसाइकलवर दिलेल्या स्टंटची चर्चा होते. या दरम्यान, अजय देवगणचे अनेक चित्रपट हे हीट झाले आणि प्रेक्षकांच्या मनावर तो राज्य करु लागला. अजयला त्याच्या करिअरमध्ये अनेक पुरस्कार मिळाले.

## सलमान आणि अर्जुन कपूरचे संबंध ताणल्याची बोनी कपूरने दिली कबुली



मुंबई,२ एप्रिल (पीएसआय)

बोनी कपूर निर्माण करत असलेल्या अजय देवगण स्टारर 'मैदान' चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज होत आहे. या दरम्यान बोनी कपूर यांनी त्यांचा मुलगा अर्जुन कपूर आणि सलमान खान यांच्यात वाढत गेलेल्या तणावाच्या नात्याबद्दल चर्चा केली. 'मैदान' चित्रपटाच्या प्रमोशन मुलाखतीदरम्यान बोनी यांनी खुलासा केला की सलमान आणि अर्जुनच्या बदललेल्या समीकरणामुळे त्याच्या सलमान बरोबरच्या नात्यात काहीच फरक पडला नाही. त्यांचे संबंध पूर्वी होते तसेच असल्याचंही बोनीने सांगितले.

एका डिजिटल प्लॅटफॉर्मला दिलेल्या मुलाखतीत बोनी यांनी अर्जुन आणि सलमान यांच्यात तणावाचं नातं निर्माण झाल्याची कबुली दिली. सलमानचा भाऊ अरबाज खानची पत्नी मलायका अरोराशी अर्जुन कपूरचे संबंध आहेत. सध्या तिचा अरबाजशी घटस्फोट झाला असला तरी त्यांच्या या नात्यानं सलमान दुखावला गेला. शिवाय सलमानची बहिण अर्पिता खानशी अर्जुन कपूरचे संबंध असल्याचा पूर्वी चर्चा रंगल्या होत्या. मात्र त्यांचाही २००५ मध्ये ब्रेकअप झाला. नंतरच्या काळात अर्पिता आणि आयुष शर्मा यांचे प्रेम जुळले आणि दोघांनी लग्न केलं. आता ते दोन मुलांचे पालक आहेत.

बोनी कपूर यांनी आपल्या मुलाखतीत सलमानबरोबर असलेलं त्याचं नातं कायम असल्याचं सांगितलं. अर्जुनच्या कारकिर्दीचा जेव्हा प्रश्न निर्माण झाला होता तेव्हा त्याला मदत करणारा सलमान खानच होता हे त्यांनी आवर्जून सांगितलं. सलमान खानमुळेच अर्जुन कपूर अभिनय करु शकला आणि त्याला आपल्या कारकिर्दीत यशस्वी होण्यासाठीचा सूर सापडल्याचे बोनी कपूरने कृतज्ञतापूर्वक सांगितलं.

सलमानबद्दल बोलताना बोनी कपूर म्हणाले, '' आई मोना कपूरला (बोनी कपूरची पहिली पत्नी) गमावल्यानंतर अर्जुन पुन्हा अभिनय करु शकेल, असं मला वाटत नव्हतं. सलमाननेच मला फोन करून सांगितलं की, 'बोनी सर, तो अभिनेता होऊ शकेल. त्याच्यात ती क्षमता आहे.' तो अभिनेता होईल याची जबाबदारीही सलमाननंच घेतली होती.''

अर्जुन आणि सलमान यांच्यातील ताणलेल्या संबंधांमुळे त्याच्या स्वत:च्या नातेसंबंधावर परिणाम झाला का, असे विचारले असता बोनी म्हणाले, ''सलमान बरोबरचे माझे समीकरण बदलले नाही. मी अजूनही त्याच्यावर प्रेम करतो, मला अजूनही वाटते की त्याच्यासारखे फार कमी लोक आहेत. तो मोठ्या आणि प्रेमळ मनाचा आहे, प्रत्येकवेळी तो मला प्रेमाने भेटतो. तो मला खूप आदराने वागवतो आणि मी त्याच्यावर प्रेम करतो.''

## तुम्ही डेटला गेल्यावर या चुका करता का? चुका टाळण्याच्या सिक्रेट टिप्स



आपण जेव्हा एखाद्या व्यक्तीला डेट करतो तेव्हा आपल्याकडून नकळत काही चुका होतात. त्या चुका कोणत्या आहेत, त्या चुका पुन्हा होऊ नयेत म्हणून काय केले पाहिजे हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

१. वेळ द्या -

प्रत्येक गोष्टीला वेळ देणे जसं गरजेचे आहे. तसेच नात्याच्या बाबतीतही आहे. एखादं नातं फुलवायला वेळ लागतो. पण एकदा का ते फुललं ते कायम टिकतं. जेव्हा तुम्ही डेटिंग करता तेव्हा समोरील व्यक्तीला वेळ देणे खुप महत्त्वाचे आहे. डेटिंग करत असताना दोन्ही व्यक्ती एकमेकांना जोडीदाराच्या नजरेने पाहत असतात. त्यामुळे त्याच्या विचारांना न दुखवता त्या व्यक्तीला मान दिला पाहिजे आणि आपले विचार देखील समोर मांडले पाहिजे. समोरचा व्यक्ती तुमच्या वागण्याचं परिक्षण देखील करत असते म्हणूनच असं कोणतेही गैरवर्तन करु नका.

२. ओव्हरशेअरिंग करणे टाळा -

डेटिंग करताना आपण पहिल्यांदा समोरील व्यक्तीला भेटतो. तेव्हा भावनेच्या भरात अतिरिक्त खाजगी माहिती देणे बरोबर नाही. कुठली गोष्ट कुठे बोलली पहिजे, किती बोलली पाहिजे हे आपल्यालाच समजलं पाहिजे. तुम्ही चुकीची किंवा जे बोलायचं नाही असं बोलून बसलात तर अशा वागण्याने कदाचित ती व्यक्ती तुयमच्यापासून दूर जाऊ शकेल.

३. योग्यता सिद्ध करण्याची गरज नाही -

तुम्ही त्या व्यक्तीसाठी योग्य आहात हे तुम्हाला वारंवार सिद्ध करायची गरज नाही. कोणतंही नातं तयार होण्यासाठी किंवा टिकून राहण्यासाठी त्या व्यक्तींमधील समजूतदारपणा महत्त्वाचा ठरतो. समजूतदार पण असेल तरच तुमचं नातं हेल्थी राहू शकतं. तुम्ही इतरांसोबत स्वत:ची तुलना करण्यात वेळ वाया घालवू नका. नेहमी लक्षात ठेवा की डेटिंग करताना समोरील व्यक्तीला प्रभावित करण्यापेक्षा त्या व्यक्तीला व्यक्त होण्यासाठी तसे वातावरण निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

४. निवडकर्ते होऊ नका -

डेट करताना समोरील व्यक्तीची निवड करण्याऐवजी मी त्या व्यक्तीसाठी योग्य आहे का? असा प्रश्न स्वत:ला विचारा. एखाद्याची निवड करणे खुप सोपं आहे. पण आपण या त्या व्यक्तीसाठी तुम्ही खरंच योग्य आहात का याचं उत्तर शोधणे थोडं कठीण आहे.

५. काल्पनिक जगात नाही वास्तवात जगा -

डेट करताना समोरील व्यक्तीचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला याचा अर्थ असा होत नाही की ती तुमच्यासोबत पुर्ण आयुष्य घालवायला तयार आहे. त्यावेळेस काल्पनिक विचारात न जगता वास्तवात जगा.

६. थेट संवाद -

कुणाला डेट करताना तुम्ही समोरच्याने तुमच्या मनातील सर्व काही ओळखावं असं तुम्हाला वाटत असेल तर तुमची ही अपेक्षा चुकीची आहे. तुम्ही तुमच्या लिमिटेशन्स आणि तुमच्या इच्छा, भविष्यातील स्वप्न आधीच बोलून स्पष्ट करणं गरजेचं आहे. थेट बोलणं कधीही चांगलं असते.

## साबण की बॉडीवॉश, तुमचाही झाला आहे का गोंधळ, कोणते वापरु शकता हे जाणून घ्या?



आजकाल बहुतेक लोक साबण किंवा बॉडी वॉश यापैकी एक निवडायचे याबद्दल गोंधळलेले दिसतात. या दोन उत्पादनांपैकी कोणते आपल्या त्वचेसाठी अधिक फायदेशीर ठरतील? काही लोक जास्त साबण वापरतात, तर काही लोक बॉडी वॉशला साबणाचा पर्याय मानतात.साबण त्वचेवर साचलेली घाण साफ करण्याचेही काम करते आणि बॉडी वॉशमुळे शरीरावर साचलेली अशुद्धताही साफ होते. साबण आणि बॉडी वॉश यात काय चांगले आहे याबद्दल तुमचा गोंधळ दूर करण्याचा प्रयत्न आम्ही करतो.

आजही लोक साबणच वापरतात. ते फक्त अंघोळ करताना किंवा हात धुताना साबण वापरतात. साबण वापरण्यामागचे एक कारण म्हणजे त्याचा सुगंध तीव्र असतो, ज्यामुळे तुम्हाला दीर्घकाळ ताजेतवाने वाटू शकते. पण अनेक वेळा साबणाच्या अतिवापरामुळे त्वचा कोरडी होते.

आंघोळीच्या साबणात सोडियम लॉरील सल्फेट नावाचे रसायन असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी होऊ शकते. साबणाच्या अतिवापरामुळे त्वचेतील नैसर्गिक तेल निघून जाते. याशिवाय, साबण कमी स्वच्छ मानला जातो, कारण तो उघडा राहतो, जो अनेक जीवाणूंच्या संपर्कात येऊ शकतो.

मात्र, साबणासोबतच लोक बॉडी वॉशचाही वापर करत आहेत. साबणापेक्षा बॉडी वॉश त्वचेसाठी अधिक फायदेशीर ठरू शकतो.

बॉडी वॉशमध्ये साबणापेक्षा चांगली पीएच पातळी असते. याशिवाय यात साबणापेक्षा जास्त मॉइश्चरायझिंग गुणधर्म देखील आहेत.

आंघोळीनंतर तुमची त्वचा कोरडी असेल तर तुम्ही साबणाऐवजी बॉडी वॉशचा वापर सुरू करा. ते त्वचेला आर्द्रता देते. दुसरीकडे, जर तुम्हाला सोरायसिस किंवा मुरुमांसारख्या त्वचेच्या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर तुम्ही सौम्य बॉडी वॉश देखील वापरू शकता.

## चेहऱ्यावर पाहिजे असेल ग्लो... रात्री झोपताना हा फेसपॅक जरुर लावा...

चेहऱ्याची काळजी घेणे खुप गरजेचे आहे. रात्री झोपताना फेसपॅक कसा तयार करायचा, त्याचे काय फायदे आहे याविषयीची माहिती इथे आम्ही सांगणार आहोत...


चेहऱ्याची काळजी घेणे खुप महत्वाचे आहे. हल्ली वाढलेल्या प्रदुषणामुळे चेहऱ्याची जितकी काळजी घेतली जाईल तितका वेळ चेहऱ्यावरील ग्लो दिसेल. पण लोक सध्या धावपळीमुळे फारसं लक्ष देत नाहीत. मग परिणामी आपल्याला चेहऱ्यावर पुरळ येणे, पीम्पल्स येणे, चेहऱ्यावर खाज येणे, चेहरा ड्राय होणे असे बरेचसे त्रास सुरु होतात. मग आपण झोपेतून जागे होतो आणि यूट्युबवर झटक्यात चेहऱ्यावर ग्लो कसा येईल? याच्या व्हिडीओ पाहु लागतो. त्या व्हिडीओत यूट्युबरने सांगितल्याप्रमाणे आपण काही केमिकल वस्तू खरेदी करतो. कालातंराने ते प्रोडक्टस आपल्या चेहऱ्यावर चांगले परिणाम करत नाहीत. त्यामुळे आपल्या चेहऱ्यावर ग्लो नाही दिसत तो रखरखीत दिसू लागतो. आम्ही तुम्हाला यामध्ये असे घरगुती उपाय सांगणार आहोत ज्यामध्ये तुमचा चेहरा तजेलदार आणि टवटवीत दिसेल. तुम्हाला जास्त खर्च करावा लागणार नाही तर पाहुया रात्री झोपतानाचा फेसपॅक...

रात्री झोपतानाच का फेसपॅक लावावा?दिवसभर जसे आपण थकलेले असतो तसाच आपला चेहरा सुद्धा थकलेला असतो. त्यामुळे चेहऱ्याची काळजी रात्री घेणे खुप गरजेचे आहे. रात्री झोपताना फेसपॅक लावल्यास चेहरा दिवसभर तुकतुकीत राहतो. रात्री फेसपॅक लावल्यास तो चेहऱ्यात चांगलाच मुरतो. त्यामुळे चेहऱ्याला खुप फायदे होतात. तुम्हाला फायद्यांसकट ३ प्रकारचे फेसपॅक सांगणार आहोत :मलाई आणि गुलाबजल फेसपॅक हा फेसपॅक बनवण्यासाठी मलाई आणि गुलाबजल एका वाटीत घेऊन त्यांचे चांगले मिश्रण करा. आता या फेसपॅकला चेहरा आणि मानेवर हलक्या हाताने मालिश करत लावा. हा फेसपॅक चेहऱ्यावर १५ ते २० मिनिटांपर्यंत ठेवा आणि नंतरला कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा फेसपॅक लावल्याने चेहऱ्याला पोषण मिळते आणि चेहऱ्यावर ग्लो येतो. लिंबू आणि मधाचा फेसपॅक

लिंबू आणि मधाचा फेसपॅक बनवण्यासाठी एका वाटीत लिंबाचा रस आणि मध यांचे मिश्रण तयार करा. आता या मिश्रणाला चेहरा आणि मानेवर लावा. हा फेसपॅक १५ मिनिटांपर्यंत चेहऱ्यावर ठेवा आणि मग चेहरा कोमट पाण्याने धुवा. हा फेसपॅक दररोज लावल्याने फ्रॅकल्सची समस्या कमी होते. हळद आणि दुधाचा फेसपॅक

हळद आणि दुधाचा फेसपॅक तयार करण्यासाठी एका वाटीत हळद आणि दुधाचे मिश्रण तयार करा. या मिश्रणाला चेहरा आणि मानेवर लावा. या फेसपॅकमुळे चेहरा चमकदार होतो.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# शिक्षणामुळेच क्रांती घडते : डॉ. मल्लिकार्जुन करजगी



लातूर (प्रतिनिधी):- गुणवत्ता मिळविण्यासाठी मेहनत करावी लागते, मेहनत आणि शिक्षणामुळेच नवक्रांती घडू शकते, त्यासाठी शिबिर आणि समाजप्रबोधन कार्यक्रमाची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी आज येथे केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने परभणी- हिंगोली जिल्हास्तरीय युवक -युवती नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कांतराव पोले यांची उपस्थिती होती तर यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. विश्वनाथ रासवे, डॉ.बालाजी शिंदे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर संस्थेचे संस्थापक प्राचार्य डॉ शिवाजीराव दळणर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर उत्कृष्ट निवास आणि भोजन व्यवस्था केल्याबद्दल रामेश्वर सोनसळे, उत्कृष्ट छायाकण केल्याबद्दल प्रा डॉ. कपिल लामतुरे, उत्कृष्ट सेवा पुरविल्याबद्दल गिरीधर यमगर, उत्कृष्ट तंत्रसहाय्य केल्याबद्दल गोवर्धन जोगदंड आणि उत्कृष्ट सूत्रसंचलन केल्याबद्दल डॉ. तुकाराम बोबडे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सहभागी युवक- युवती यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे.

यावेळी करजगी म्हणाले, ग्रामीण भागातूनच विद्यार्थी घडतात. शहरातील महाविद्यालयामध्ये सोयी सुविधा उपलब्ध असतात मात्र तेथील विद्यार्थी कमी प्रमाणात घडतात. गुणवंत विद्यार्थी शिबिरामधून घडत असतात कारण शिबिरामध्ये तज्ञ व्यक्तींचे भाषणे, माहिती, मुलाखती ऐकायला मिळत असतात.नवक्रांती घडविण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणाशिवाय क्रांती घडू शकत नाही. शिक्षणातून व्यक्ती मोठा होऊ शकतो. शेवटच्या क्षणापर्यंत शिक्षण शिकत राहिले पाहिजे. या पाचदिवसीय शिबिरामधून एक जरी विद्यार्थी घडला तर या शिबिराचे फलित झाले आहे, या शिबिरामधून तसे दिसत आहे, म्हणजेच ग्रामीण भागातील या शिबिराचे आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभगाचे कौतुक केले आहे. त्याचबरोबर भारतीय समाज सुधारला पाहिजे समाजामध्ये सामाजिक योगदान महत्त्वाचे आहे. शिक्षण घेत -घेत समाजसेवा केली पाहिजे. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभाग घेतला पाहिजे, यातूनच आदर्श विद्यार्थी व चांगला माणूस घडू शकतो. झोपेत जे पडतात ते स्वप्न असतात. झोपेत स्वप्न पडतात आणि झोपू देत नाहीत ते स्वप्न असतात, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे मारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कांतराव पोले म्हणाले, युवकासमोर दृष्टी असली पाहिजे. नेतृत्व गुण मिळविण्यासाठी विकासाच्या वाटचालीकडे लक्ष दिले पाहिजे. दिशा आणि दृष्टी प्राप्त झाली तरच विद्यार्थी घडू शकतो. लोकशाहीमध्ये डोके मोजले जातात आणि या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचे ज्ञान दिले जाते. विद्यार्थ्यांनी ज्ञान मिळण्यासाठी शिबिराचा लाभ घेतला पाहिजे असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. बालाजी शिंदे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. तुकाराम बोबडे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विश्वनाथ रासवे यांनी मानले. या कार्यक्रमाला युवक -युवती आणि शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकोला लोकसभा मतदारसंघाची निवडणूक; १७ उमेदवारांचे अर्ज मंजूर

अकोला : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत अकोला मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी २८ उमेदवारांकडून दाखल करण्यात आलेल्या उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया शुक्रवार ५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पूर्ण करण्यात आली. त्यामध्ये ११ उमेदवारांचे उमेदवारी अर्ज नामंजूर आले असून १७ उमेदवारांचे अर्ज मंजूर आले.

अकोला लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी २८ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आले. अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत (४ एप्रिलपर्यंत) २८ उमेदवारांकडून ४० अर्ज जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिका-यांकडे दाखल करण्यात आले होते. संबंधित उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया ५ एप्रिल रोजी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अजित कुंभार यांच्यामार्फत पूर्ण करण्यात आली. छाननीत २८ पैकी ११ उमेदवारांचे उमेदवारी अर्ज नामंजूर करण्यात आले असून १७ उमेदवारांचे उमेदवारी अर्ज मंजूर करण्यात आले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी अजित कुंभार, निवडणूक निरीक्षक (सामान्य) रामप्रतापसिंग जाडोन, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शरद जावळे आदी उपस्थित होते.

छाननी प्रक्रियेत ११ उमेदवारांचे अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. त्यामध्ये रमेश इंगळे (बहुजन समाज पार्टी), अरूण भागवत (अपक्ष), पूजा शर्मा (अपक्ष), सचिन शर्मा (अपक्ष), नितीन वालिंसगे (अपक्ष), महेंद्र मिश्रा (अपक्ष), अंबादास दांदळे (अपक्ष), प्रमोद पोहरे (अपक्ष), ॲड. रामभाऊ खराटे (वीरों के वीर इंडियन पार्टी), रजनीकांत (अपक्ष), शेख मजहर शेख इलियास (अपक्ष) यांचा समावेश आहे.

छाननीत १७ उमेदवारांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. त्यामध्ये अनुप धोत्रे (भारतीय जनता पार्टी), ॲड. प्रकाश आंबेडकर (वंचित बहुजन आघाडी), डॉ. अभय पाटील (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), मुरलीधर पवार (अपक्ष), मो. एजाज मो. ताहेर (अपक्ष), धर्मेंद्र कोठारी (अपक्ष), अशोक थोरात (अपक्ष), रत्नदीप गणोजे (अपक्ष), काशिनाथ धामोडे (बहुजन समाज पार्टी), शेख नजीब शेख हबीब (इंडियन नॅशनल लिग), प्रीती सदांशिव (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सोशल), बबन सयाम (जनसेवा गोंडवाना पार्टी), नारायणराव गव्हाणकर (अपक्ष), रविकांत अढाऊ (जय विदर्भ पार्टी), दिलीप म्हैसने (अपक्ष) गजानन दोड (अपक्ष), ॲड. उज्वला राऊत (प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टी) यांचा समावेश आहे.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन अंतर्गत एनर्जी ऑडिट संपन्न

लातूर (प्रतिनिधी) दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे मनॅक मूल्यांकनफ अंतर्गत ऊर्जा लेखापरीक्षण करून दि ५ एप्रिल रोजी अहवाल सादर करण्यात आले. एनर्जी ऑडिट इमारतीमध्ये वापरात असलेल्या ऊर्जेच्या नुकसानाच्या जोखमीचे मूल्यांकन करतात. ऊर्जेचे प्रबंधन करून २५ % बचत व्हावी या उद्देशाने प्रभारी प्राचार्य डॉ. आर.एस. पवार यांच्या अध्यक्षतेखाली मनॅक मूल्यांकनफ अंतर्गत पर्यावरण आराखड्याची बैठक आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी महाऊर्जा महाराष्ट्र शासन एम्पानेलड ऊर्जा लेखापरीक्षक केदार खमितकर, आईक्यूएसी समन्वयक डॉ.बालाजी सर, डॉ.मनीषा मॅडम यांची प्रमुख उपस्थित होती. शाश्र्वत विकासाच्या अंतर्गत ऊर्जा संवर्धन धोरण दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने आज जाहीर केले. ऊर्जा-कार्यक्षम इमारती कमीत कमी ऊर्जा वापरतात. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने व्यावसायिक इमारतींचे स्टार रेटिंग २००९ मध्ये भारतात लाँच केला आहे. जो इमारतीमधील ऊर्जा वापरावर आधारित आहे. या प्रोग्राममध्ये, इमारतींना १ ते ५ स्केलवर रेट केले जाते, ज्यामध्ये ५-स्टार लेबल असलेल्या इमारती सर्वात कार्यक्षम आहेत. वित्तीय वर्ष २०२४ साठी वाणिज्य इमारतीत ऊर्जेचा कार्यक्षम वापर आणि बचतीचे लक्ष्य पॉलिसी मध्ये देण्यात आले आहेत असे सांगण्यात आले.

# प्रियदर्शनी प्राथमिक विद्यामंदिरचा आदर्श तवडे याचा नवोदय परीक्षेत यश



वलांडी -देवणी तालुक्यातील रामलिंग जवळगा येथील प्रियदर्शनी प्राथमिक विद्यामंदिरचा आदर्श उमाकांत तवडे या विद्यार्थ्याची नवोदयसाठी निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य रामलिंग मुळे व संस्थेचे सचिव इंजिनियर अनिल मुळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ हार देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच संत भगवान बाबा विद्यालय धामणगाव ता. शिरूर अनंतपाळ येथील नूतन मुख्याध्यापक रवीकुमार पाटील साकोळकर यांचा संत भगवान बाबा प्रसारक मंडळाचे अध्यक्ष इंजिनिअर अनिल मुळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अरुण मुळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रियदर्शनी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, जवळग्याचे माजी सरपंच तथा प्राचार्य रामलिंग मुळे , संस्थेचे सचिव इंजिनीयर अनिल मुळे, धनेगावचे उपसरपंच रामलिंग शेरे, हिसामनगरचे सरपंच विजय मुके, सुनील मुळे, सुरज मुळे, संत भगवान बाबा विद्यालयाचे नूतन मुख्याध्यापक रवी कुमार पाटील साकोळकर, प्रियदर्शनी प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक उद्धव तवडे, गोविंद बिरादार, इंद्रजीत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी जवळग्याचे माजी सरपंच तथा प्राचार्य रामलिंग मुळे हे म्हणाले की माजी मुख्यमंत्री कै. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या सहकार्यामुळेच संस्थेला मान्यता मिळाली. आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. नागनाथराव मुळे, कै.विश्र्वनाथ मुळे, कै.प्रताप रेड्डी पाटील,कै. दत्तात्रय बिरादार,कै. रामराव पाटील, कै.यशवंत मुळे या सर्वांची आठवण काढून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली आणि मागील आठवणीला उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी केले तर आभार माधव पाटील यांनी मानले.या कार्यक्रमाला गावातील धनेगाव, धामणगाव येथील बरेच कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छाननी नंतर नांदेड लोकसभेसाठी ६६ उमेदवार पात्र तर ८ अपात्र शनिवारी सायं ६.१५ पर्यंत अर्ज परत घेता येणार

## सोमवारी दुपारी ३ वाजेपर्यंत अंतिम मुदत

नांदेड (प्रतिनीधी): नांदेड लोकसभा निवडणुकीच्या छाननीमध्ये ६६ उमेदवार पात्र ठरले आहेत तर ८ उमेदवार अपात्र ठरले आहेत. ८ एप्रिल ला दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज परत घेता येणार आहेत. त्यामुळे ८ एप्रिल नंतर १६-नांदेड लोकसभा मतदारसंघामध्ये अंतिम उमेदवारी निश्र्चित होणार आहे.

तत्पूर्वी आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सर्वसाधारण निरीक्षक शशांक मिश्र यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिका-यांसोबत नियोजन भवनामध्ये झालेल्या बैठकीत अर्ज रद्द करतांना उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. कोणत्या कारणाने त्यांचे उमेदवारी अर्ज रद्द होत आहेत याबद्दलची माहिती दिली. चुकीचे प्रतिज्ञापत्र, सूचकांची संख्या, सुरक्षा रक्कम जमा न करणे आदी करणांवरून ९ अर्ज रद्द करण्यात आले. एका इच्छूक उमेदवाराचे दोन अर्ज रद्द झाले. काल पर्यंत ९२ अर्ज दाखल झाले होते. ९ अर्ज आज रद्द करण्यात आले. ६६ उमेदवारांनी हे अर्ज दाखल केले होते. काही उमेदवारांनी एकापेक्षा अधिक अर्ज दाखल केले होते.

अपात्र उमेदवार अपात्र ठरलेल्या उमेदवारांमध्ये विष्णु मारूती जाधव, अलिमोद्दीन मोहियोद्दीन काझी सय्यद, माधवराव मुकिंदा गायकवाड, आनंदा धोंडिबा जाधव, सुरेश दिगांबर कांबळे, दिगांबर धोंडिबा वाघमारे, आनंदा पुंडलिकराव वाघमारे, सोपान नवेल पाटील यांचा समावेश आहे.

पात्र उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

चिखलीकर प्रतापराव गोविंदराव (भाजप), पांडुरंग रामा अडगुळवार (बहुजन समाज पार्टी), वसंतराव बळवंतराव चव्हाण (इंडियन नॅशनल काँग्रेस), अब्दुल रहीम अहमद (देश जनहित पार्टी), अविनाश विश्र्वनाथ भोसीकर (वंचित बहुजन आघाडी), कौसर सुलताना (इंडियन नॅशनल लीग), राहुल सुर्यकांत एंगडे (बहुजन मुक्ती पार्टी), रुक्मिणीबाई शंकरराव गीते (भारतीय प्रजा सुराज्य पक्ष), शेख मोईन शेख रशीद (ऑल इंडिया मजलिस ए इन्कलाब ए मिल्लत), सय्यद तनवीर (बहुजन महा पार्टी), सुशीला निळकंठराव पवार (समनक जनता पार्टी), हरी पिराजी बोयाळे (बहुजन भारत पार्टी) यांचा समावेश आहे.

तर अपक्षांमध्ये अकबर अख्तर खॉन, अक्रम रहेमान सय्यद, अनवर अ. कादर अहमद कादर शेख, अमजत खॉ सखर खॉन, अरुण भागाजी साबळे, अश्फाक अहमद, असलम इब्राहिम शेख, शेख इमरान शेख पाशा, इरफान फारूक सईद, मोहम्मद इलियाज अब्दुल वहिद मोहम्मद, कदम सुरज देवेंद्र, कल्पना संजय गायकवाड, खान अलायार युसुफ खान, अहमद खालिद अहमद रफीक, गजानन दत्तारामजी धुमाळ, जगदीश लक्ष्मण पोतरे, जफर अली खाँ मेहमूद अली खाँ पठाण, जुल्फेखान जिलानी सय्यद, तबस्सुम बेगम, तुकाराम गणपत बिराजदार, थोरात रवींद्र गणपतराव, देविदास गोविंदराव इंगळे, नय्यर जहाँ मोहम्मद फेरोज हुसेन, नागेश संभाजी गायकवाड, नागोराव दिगंबर वाघमारे, निखिल लक्ष्मणराव गर्जे, प्रमोद किसनराव कामठेकर, फहाद सलीम शेख सलीम शेख, भास्कर चंपतराव डोईफोडे, मजिद अ अकबर, मोहम्मद तौफिक मोहम्मद युसुफ, मोहम्मद मुबीन शेख पाशा, मोहम्मद सलीम मोहम्मद इकबाल, महारुद्र केशव पोपळाईतकर, ॲड. मारोतराव कान्होबाराव हुक्के पाटील, मोहम्मद नदीम मोहम्मद इक्बाल, मोहम्मद वसीम, मोहम्मद सिद्दीकी शेख संदलजी, युनिस खान, युनिस खाँ युसुफ खाँ, रमेश दौलती माने, राठोड सुरेश गोपीनाथ, लतीफ उल जाफर कुरेशी, लक्ष्मण नागोराव पाटील, ॲड. विजयसिंह चौव्हाण, विनयमाला गजानन गायकवाड, वैशाली मारोतराव हुके पाटील, शिवाजी दत्तात्रय गायकवाड,साहेबराव नागोराव गुंडीले, साहेबराव भिवा गजभारे,ज्ञानेश्र्वर बाबुराव कोंडामंगले ज्ञानेश्र्वर रावसाहेब कपाटे, शाहरुख खमर, मोहनराव आनंदराव वाघमारे यांचा समावेश आहे.

शनिवारीही अर्ज परत घेता येईल लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज परत घेण्याची मुदत ८ एप्रिल आहे. मात्र उद्या शनिवार दिनांक ६ एप्रिल रोजी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र परत घेता येणार आहेत. सोमवारी सकाळी ९.४५ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज परत घेता येणार आहेत. रविवारी मात्र सुट्टीचा दिवस आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसात उमेदवारांना आपले नामनिर्देशनपत्र परत घेता येणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विकास माने यांनी दिली आहे.








उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |

| | |
|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशोर (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# मुंबईचे सलग तीन पराभव, हार्दिक पांड्या महादेवाच्या चरणी, सोमनाथ मंदिरात पूजा



अहमदाबाद-मुंबई इंडियन्सची यंदाच्या आयपीएलची सुरुवात समाधानकारक झालेली नाही. मुंबईच्या टीमला पहिल्या तीन मॅचमध्ये पराभव स्वीकारावे लागले आहेत. मुंबईला एकही विजय न मिळवता आल्यानं ते गुणतालिकेत सध्या दहाव्या स्थानी आहेत. मुंबई इंडियन्सनं यंदाच्या आयपीएलमध्ये एक मोठा बदल केला. रोहित शर्माच्या जागी मुंबईचं कप्तानपद हार्दिक पांड्याकडे देण्यात आलं आहे. हार्दिकला देखील यंदाच्या आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करता आलेली नाही. या पार्श्वभूमीवर हार्दिक पांड्या गुजरातमधील सोमनाथ मंदिरात दाखल झाला. मुंबई इंडियन्सची तिसरी मॅच राजस्थान रॉयल्स विरुद्ध १ एप्रिल रोजी झाली होती. त्या मॅचमध्ये मुंबईला पराभव स्वीकारावा लागला होता. यानंतर मुंबईची मॅच थेट ७ एप्रिलला होणार आहे. या दरम्यानच्या काळात मुंबईची टीम जामनगरला ट्रीपला गेली असल्याचे समोर आले होते. या दरम्यान हार्दिक पांड्या सोमनाथ मंदिरात दाखल झाला आणि त्याने मंदिरात पूजा अर्चा केली.

रोहित शर्माऐवजी हार्दिक पांड्याला मुंबईचे कप्तान केल्यानंतर सोशल मीडियावरुन पांड्याला मोठ्या प्रमाणात टीका करण्यात आली आली. नेटकऱ्यांनी हार्दिक पांड्याला ट्रोल केले. मुंबईला सलग तीन मॅचमध्ये पराभव स्वीकारावा लागला.

मुंबई इंडियन्सची पुढील मॅच रिषभ पंतच्या दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध होणार आहे. ही लढत ७ एप्रिलला मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर होईल. या मॅचपूर्वी हार्दिक पांड्या सोमनाथ मंदिरात दाखल झाला आणि त्यानं पूजा अर्चा केली. याचा व्हिडीओ देखील समोर आला आहे.

मुंबई पलटवार करणार?

आयपीएलमध्ये पाचवेळा विजेतेपद पटकावणाऱ्या मुंबईला यंदाच्या हंगामात पहिल्या विजयासाठी संघर्ष करावा लागत आहे. मुंबईला गुजरात, हैदराबाद आणि राजस्थान विरुद्ध विजय मिळवता आलेला नाही. मुंबई इंडियन्सच्या पुढील तीन मॅचेस होम ग्राऊंड असलेल्या वानखेडे स्टेडियमवर होणार आहेत. दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध ७ एप्रिलला मुंबईची मॅच असेल. याशिवाय मुंबई इंडियन्स होमग्राऊंडवर ११ एप्रिलला आरसीबी आणि १४ एप्रिलला चेन्नई सुपर किंग्ज यांच्या विरुद्ध खेळेल. मुंबईला पुढील मॅचेस जिंकून आयपीएलमध्ये कमबॅक करण्याची संधी आहे.

सूर्यकुमार यादवचं कमबॅक

मुंबई इंडियन्सचा आघाडीचा फलंदाज आणि टी २० क्रिकेटमधील जागतिक क्रमवारीतील अग्रस्थानी असलेल्या सूर्यकुमार यादवचे कमबॅक झाले आहे. आता सूर्यकुमार यादव दुखापतीतून बरा होऊन परतल्यानंतर मुंबईची बॅटिंग तगडी झाली आहे. आता सूर्यकुमार यादव संघात आल्यानं हार्दिक पांड्याचं टेन्शन देखील कमी झाले आहे.

# सूर्यकुमार यादवचे मुंबई इंडियन्सने केले खास स्वागत; व्हिडीओ व्हायरल



मुंबई,५ एप्रिल (पीएसआय)

मुंबई इंडियन्सची आयपीएल २०२४ च्या हंगामात चांगली सुरुवात झाली नाही. मुंबईचा सलग ३ सामन्यात पराभव झालेला आहे. या हंगामातील पहिल्या विजयाची वाट पाहत आहे.

मुंबईचा आगामी सामना ७ एप्रिलला ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे. वानखडे मैदानावर हा सामना रंगणार आहे. याचदरम्यान मुंबईच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. स्फोटक फलंदाज मुंबईच्या ताफ्यात दाखल होण्यासाठी आज रवाना झाला आहे. नुकतेच सूर्यकुमार यादवला बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमकिडून मंजुरी मिळाली होती. सूर्यकुमार यादवने तंदुरुस्तीच्या चाचणीत जवळपास सर्व निकष पूर्ण केले आहेत.

सूर्या बनला 'अक्षय कुमार यादव'...

मुंबई इंडियन्सने त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून एक मजेदार व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये सूर्यकुमार यादव अक्षय कुमारच्या रुपात दाखवण्यात आला आहे. त्याचवेळी, चाहते व्हिडिओमध्ये सूर्यकुमार यादवला 'अक्षय कुमार यादव' म्हणताना दिसत आहेत. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे- समजले का? नाही, तुम्हाला समजले नाही... असो, मुंबई इंडियन्सची पोस्ट सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. याशिवाय सोशल मीडिया यूजर्स सातत्याने कमेंट करून आपले मत व्यक्त करत आहेत.

दिल्लीविरुद्ध सूर्या मैदानात उतरणार-

सूर्यकुमार यादव दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध मैदानात परतणार आहे. मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना ७ मार्च रोजी वानखेडे मैदानावर होणार आहे. पॉइंट टेबलमध्ये सध्या मुंबई इंडियन्स तळाशी आहे. तर दिल्ली कॅपिटल्स नवव्या स्थानावर आहे. आत्तापर्यंत मुंबई इंडियन्सचा सलग तीन सामन्यांत पराभव झाला आहे. दिल्ली कॅपिटल्सला ३ सामन्यांत पराभवाला सामोरे जावे लागले, परंतु चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध विजय मिळवण्यात यश आले.

हार्दिक पांड्याला दिलासा

मुंबई इंडियन्सचा कॅप्टन हार्दिक पांड्या याचं देखील सूर्यकुमार यादवच्या कमबॅकमुळं टेन्शन मिटणार आहे. सूर्यकुमार यादव मुंबई इंडियन्सकडून चौथ्या किंवा पाचव्या स्थानावर बॅटिंग करतो. तो संघात नसल्यानं हार्दिक पांड्याला वरच्या क्रमांकावर फलंदाजीला यावं लागत होतं. ती समस्या आता दूर होऊ शकते. मुंबईला गुजरात टायटन्स विरुद्धच्या मॅचमध्ये ६ धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. सूर्यकुमार यादव संघात परतल्यानं हार्दिक पांड्याला दिलासा मिळणार आहे.

# रोहित-हार्दिकनंतर बाबर-शाहिनमध्ये
## कर्णधारपदावरुन वाद पेटला? एका पोस्टने खळबळ

मुंबई-राष्ट्रीय संघातून खेळण्याचे आणि त्यातच कर्णधार होण्याचे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. पण कर्णधारपद मिळवल तितके सोप नसते. त्यामागे कठोर मेहनत आणि जिद्द लागते. पण त्याचबरोबर टीका आणि वादालाही सामोरे जावे लागते. याचे ताजं उदाहरण म्हणजे मुंबई इंडियन्स. आयपीएलच्या सतराव्या हंगामाआधी मुंबई इंडियन्स व्यवस्थापनाने पाचवेळा विजेत्या रोहित शर्माची उचलबांगडी करुन हार्दिक पांड्याला कर्णधार केलं. यावरुन अद्यापही वाद सुरु आहे. यामुळे मुंबईच्या संघात रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्या असे दोन गट पडल्याचीही चर्चा आहे

पाकिस्तान क्रिकेटमध्ये वाद

हा वाद ताजा असतनाच आता पाकिस्तान क्रिकेटमध्येही कर्णधारपदावरुन उभी फूट पडली आहे. पाकिस्तानचा स्टार क्रिकेटर बाबर आझम आणि वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रीदीमध्ये सर्व काही आलबेल नसल्याचं बोललं जात आहे. एका आठवड्यापूर्वीच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने पाकिस्तान क्रिकेट संघाच्या कर्णधारपदावरुन शाहिन आफ्रीदीची हकालपट्टी करत पुन्हा बाबर आझमकडे नेतृत्व सोपवलं. यावर शाहीनने केलेल्या एका पोस्टने पाकिस्तान क्रिकेटमध्ये खळबळ उडाली आहे.

शाहिन-बाबरमध्ये उभी फूट

न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या टी२० मालिकेसाठी पीसीबीने शाहिन आफ्रिदीऐवजी पाकिस्तान क्रिकेट संघाची धुरा बाबर आझमकडे सोपवली आहे. पाकिस्तानच्या जिओ टीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार पीसीबीने शाहिन आफ्रिदीला कोणतीही कल्पना न देताच निर्णय घेतला. त्यामुळे शाहिन प्रचंड नाराज आहे. यानंतर शाहिन आफ्रिदीने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात त्याने एक शेर म्हटला आहे. यात त्याने म्हटंलय. 'मला अशा परिस्थितीत आणू नका, जिथे मला दाखवावं लागेल की मी किती क्रूर आणि निर्दयी आहे'



शाहिन आफ्रिदी नाराज

२०२३ मध्ये भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तान क्रिकेट संघाची कामगिरी अतिशय खराब झाली होती. यानंतर पीसीबीने बाबर आझमला कर्णधारपदावरुन दूर केलं. त्यानंतर कसोटी आणि टी२० संघासाठी दोन वेगळे कर्णधार नियुक्त करण्यात आले. कसोटी संघाची जबाबादारी शान मसूदकडे तर टी२० संघाची जबाबादारी शाहिन आफ्रिदीकडे सोपवण्यात आली. न्यूझीलंड दौऱ्यातील टी२० मालिकेतून शाहिनने आपल्या कर्णधारपदाची सुरुवात केली. पण हा दौरा पाकिस्तानसाठी निराशाजनक ठरला. पाच टी२० सामन्यांच्या मालिकेत पाकिस्तानला १-४ ने लाजीरवाणा पराभव स्विकारावा लागला. यानंतर अवघ्या चार महिन्यातच शाहिनची हकालपट्टी करण्यात आली.

आता न्यूझीलंडविरुद्धची मालिका आणि टी२० वर्ल्ड कप पूर्वी पुन्हा एकदा पाकिस्तान संघाची कमान बाबर आझमकडे सोपवण्यात आलीय. पीसीबीच्या या निर्णयावर शाहीनने सोशल मीडियावर पोस्ट करत अप्रत्यक्षपणे टीका केल्याचं बोललं जात आहे. शाहिनने इन्स्टा पोस्टवर पुढे म्हटलंय, 'माझ्या संयमाची परीक्षा घेऊ नका. कारण एकदा मी मर्यादा ओलांडली की मी असे काही करेन ज्याचा कोणी विचारही केला नसेल.'

पीसीबीच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह

बाबर आझमला पुन्हा कर्णधार बनवल्याने पाकिस्तान क्रिकेट फॅन्स हैराण आहेत. पीसीबीच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यावर पीसीबीने हा रणनितीचा एक भाग असल्याचे उत्तर दिले आहे. खेळाडूंच्या भल्यासाठी आणि त्यांची कामगिरी सुधारण्यासाठी असे निर्णय घ्यावे लागतात असे पीसीबीने सांगितलेय. टी२० वर्ल्ड कप पूर्वी पाकिस्तान क्रिकेट बोर्ड कोणताही धोका स्विकारु इच्छित नसल्याचेही बोलले जात आहे.

# तुळजापूरात अर्चनाताई पाटील यांना दिला त्रिशूळ



आ राणा दादा व अर्चनाताई यांचे जोरदार स्वागत

धाराशिव दि.५ (प्रतिनिधी) - उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी प्रथमच मुंबईहून सोलापूर मार्गे उस्मानाबाद मतदार संघामध्ये प्रवेश केला. तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी आलेल्या अर्चनाताई व आ राणाजगजितसिंह पाटील यांचे कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले. तर अर्चनाताई पाटील यांना कार्यकर्त्या महिलांनी त्रिशूळ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील व अर्चनाताई पाटील यांचे ढोलताशांच्या दणदणाट व फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

तुळजापुरात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्रू पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, जिल्हा समन्वयक नेताजी पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अस्मिताताई कांबळे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, नंदाताई पुनगुडे, सुनिता गुंजाळ, दत्तात्रय देवळकर, नंदकुमार गवारे, सतीश दंडनाईक, संतोष बोबडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मतदान करणाऱ्यांची मोफत नेत्रतपासणी रुग्ण सेवा मंडळाचा अभिनव उपक्रम

देगलूर (प्रतिनीधी):- नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचे प्रमाण वाढावे आणि यावेळी नांदेड लोकसभा मतदार संघात ७५ टक्केपेक्षा जास्त मतदान व्हावे या उद्देशाने जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि उपजिल्हाधिकारी सचिन गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर तालुका स्वीप कक्षाच्या वतीने विविध अभिनव उपक्रम राबवले जात आहे. देगलूर शहरात मागील ४६ वर्षापासून रुग्ण सेवा मंडळात जेष्ठ हृदयरोग तज्ञ डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या मार्गदर्शनाखाली समाज सेवेचे पवित्र कार्य करीत आहे.

या संस्थेद्वारे सिमावर्ती भागातील गोरगरीब रुग्णांना नाममात्र दरामध्ये नेत्र तपासणी, मोतीबिंदु शस्त्रक्रिया, अम्बूलंस सेवा व इतर आरोग्य सेवा नियमित दिली जाते. रुग्णसेवा मंडळाच्या वतीने मतदान जनजागृती साठी प्रोत्साहन म्हणून दि. २६ एप्रिल २०२४ रोजी जास्तीत जास्त लोकानी मतदान करावे आणि मतदान केलेल्या बोटाची शाई रुग्णसेवा मंडळामध्ये दाखवून पूर्णत: मोफत नेत्र तपासणी व उपचार करून घ्यावेत असे आवाहन स्वीप कक्ष, तहसील कार्यालय देगलूर आणि रुग्णसेवा मंडळ देगलूर यांच्या संयुक्तपणे करण्यात आलेले आहे.यासंदर्भात आज झालेल्या मतदार जनजागृती कार्यक्रमांमध्ये रुग्ण सेवा मंडळाचे उपाध्यक्ष सूर्यकांत नारलावार , सहसचिव तथा तहसील कार्यालयातील स्वीप कक्षप्रमुख प्रा. डॉ. बालाजी कतुरवार, कोषाध्यक्ष प्रा. व्ही जी चिंतावार ,संस्थेचे कार्यकारी सदस्य देवेंद्र बालाजी मोतेवार , सुभाष सांगवीकर , रमेश नारलावार , तसेच देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , डॉ. संतोष येरावार, डॉ. नीरज उपलंचवार , शिवप्रसाद स्वामी , बालाजी सुगावकर धनाजी दौलते , डॉ. लक्ष्मण सुदाम , सुभाष वडगावे, कल्याण सदानंदे , यांच्यास रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते .

यावेळी उपस्थित असलेल्या सर्व रुग्ण , रुग्णाचे नातेवाईक आणि विश्र्वस्तांना मतदानाचे पावित्र्य राखण्याची शपथ देण्यात आली.




# कुलर वापरा पण काळजीही घ्या निष्काळजीपणा ठरू शकतो जीवघेणा

लातूर, दि. ०५ एप्रिल: उन्हाळा सुरू होताच उकाड्यापासून बचाव करण्यासाठी घर, व्यावसायिक दुकाने, कार्यालये व जवळपास प्रत्येक ठिकाणी कुलरचा वापर करण्यात येतो. कुलरच्या माध्यमातून विजेचा धक्का बसल्यामुळे दरवर्षी अनेक दुर्घटना घडल्याचेही आपण पाहतो. त्या टाळण्यासाठी नागरीकांनी कुलर वापरताना योग्य ती काळजी घेणे महत्वाचे आहे. निष्काळजीपणा प्रंसगी जीवघेणाही ठरू शकतो त्यामुळे कुलर वापरताना काळजीपुर्वक वापर करावा असे आवाहन महावितरणच्यावतीने करण्यात येत आहे. कुलरसाठी नेहमी थ्री-पिन प्लगचा वापर करावा. कुलरमध्ये पाणी भरण्यापूर्वी कुलरचा वीजपुरवठा बंद करून प्लग काढून ठेवावा म्हणजे कुलरचा विजेशी काहीही संबंध राहणार नाही. पाणी भरताना ते टाकीच्या खाली सांडून बाजूला जमिनीवर पसरणार नाही, याची खबरदारी घ्यावी. पाणी भरल्यानंतर प्लग पिन लावून स्वीच चालू करावे. त्यानंतर कुलरच्या कुठल्याही भागाला स्पर्श करू नये. कुलरचे कनेक्शन व वायरिंग अधिकृत कारागिराकडून तपासून घ्यावे. अर्थिंगची तपासणी करून घ्यावी. अर्थिंग व्यवस्थित असल्यास लिकेज करंट येत नाही. कुलरच्या आतील वायर पाण्यामध्ये बुडणार नाही याची काळजी घ्यावी. पंपातून पाणी येत असल्यास वीजपुरवठा बंद करून नंतरच कुलरला हात लावावा. ओल्या हातांनी कुलरला कधीही स्पर्श करू नये. लहान मुलांना नेहमी कुलरपासून सुरक्षित अंतरावर ठेवावे आणि ती कुलरजवळ खेळणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरू नये यासाठी कुलरचा थेट जमिनीशी संपर्क येणार नाही अशी व्यवस्था करावी; जेणेकरून कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरल्यास त्याचा धक्का बसणार नाही. कुलरमधील पाण्याचा पंप ५ मिनिटे सुरू आणि १० मिनिटे बंद ठेवणाऱ्या इलेक्ट्रिक सर्किटचा वापर करावा.

यामुळे विजेचीही मोठ्या प्रमाणावर बचत शक्य होते. कुलरमधील माहिती नसल्यास कनेक्शन बदल करू नये. कुलरची दुरुस्ती चालू अवस्थेत न करता प्लग काढून नंतरच काम करावे. कुलरच्या प्लगला जोडलेली वायर खंडित वा जीर्ण झालेली असल्यास बदलून दुसरी लावण्यात यावी. अनेकदा पाण्याची पातळी खोल गेल्याने पंप सुरू करूनही पाणी खेचले जात नाही व तो पंप एअर लॉक होतो. अशावेळी प्रायमिंग करणे आवश्यक असते. मात्र चालू पंपाचे प्रायमिंग करणे टाळावे. कुलर हलवताना प्लग पिन काढून नंतरच त्याची हालचाल करावी. कुलर पंप अधूनमधून बंद करावा. घरामध्ये अर्थ लिकेज सर्किट ब्रेकर बसवून घ्यावे. अशा प्रकारे कुलरचा वापर करताना काही पथ्ये पाळल्यास आणि काही बाबी टाळल्यास या तापमानामध्ये कुलरचा गारवा सुरक्षितपणे अनुभवता येईल.

# मनपा अंतर्गत कार्यरत ३०५ अधिकारी व कर्मचारी यांनी घेतला सर्व रोग निदान शिबीराचा लाभ



लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिका, लातूर अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी दि.५ एप्रिल २०२४ वार शुक्रवार रोजी सर्व रोग निदान शिबीर आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये एकुण ३०५ अधिकारी व कर्मचारी यांना विशेष तज्ञामार्फत सेवा देण्यात आली.

मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या संकल्पनेतून तसेच उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, उपायुक्त शुभम क्यातमवार, मुख्य लेखा अधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्या सुचनेनूसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सर्व रोग निदान शिबीर राबवण्यात आले.

सदरच्या शिबीरामध्ये आरोग्य तपासणी सोबत कर्मचा-यांचे आयुष्मान कार्ड व -इक- कार्ड नोंदणी करण्यात आली. तसेच २० अधिकारी/कर्मचारी यांनी रक्तदान देखील केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.रामेश्वर कलवले, शहर लेखा व्यवस्थापक शिवकुमार तेली, तसेच डॉ. रमेश बगडे, डॉ. रोंगे, डॉ.बनसोडे, डॉ. स्वामी, डॉ. प्रेरणा जाधव, डॉ. श्रीकांत फड, डॉ.सुब्बाराव, डॉ. नितीन बर्डे, डॉ. निलेश कंदे, डॉ. अतिया सय्यद, श्री पार्श्वनाथ पाटील, आतिश सुळ, मंगेश शिरसाठ, बब्रुवान गुंजोटे, सुरेंद्र कांबळे आदींनी परिश्रम घेतले.


सुर्य कल्याण मुंबई रात्र

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

प्रो. दिपक कुमार

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.

१००% चान्स पास होणार

गोल्डन विकली चान्सेस

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | ३६-६७ | | ८०-०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | ०१-१४ | | ७८-८६ | |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी

संपर्क करा

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.

मोबा-९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे

99 75 47 98 26

## दुकान भाडयाने देणे आहे

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८





यशवंत
शनिवार दि. ६ एप्रिल २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# वडवळ येथील हनुमान मंदीरात अखंड रामकृष्ण हरीजप यज्ञास प्रचंड प्रतिसाद



वडवळ नागनाथ - येथील हनुमान मंदीरात प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी ही दोन ते सहा एप्रिल पर्यंत अखंड रामकृष्ण हरी जप यज्ञ चालू असुन भाविकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचे संयोजक महादेव शिंदे यांनी सांगितले.

या जपयज्ञा मध्ये भजनी मंडळाच्या अध्यक्षा पार्वती बाई हानमंत सुर्यवंशी उपाध्यक्ष पार्वती महादेव शिंदे ,भारतबाई भासगे ,कौसल्या निटुरे,प्रयागबाई शिंदे, ललिता बरले,कलावती चिंतलचेरे, विजयाबाई मुळे,सुशिला बरले,सरोजा गोणे,भारतबाई साबने गंगाबाई ,मुळे, गीताबाई कांबळे,फुलाबाई साबने,कलावती पेस्टे, महानंदा मुळे, रुक्मिणी चंद्रपाटले कोमल पेस्टे, भाग्यश्री साबने लक्ष्मी चंद्रपाटले,महादेव शिंदे, व्यंकटी कलकोटे धोंडीराम जनगावे आदि मंडळी रात्रंदिवस परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमात अन्न दाते म्हणून अभिमन्यू सुर्यवंशी,उदालिक सुंनपे, महादेव खडके, बळीराम बगडे, मनोहर भोजने, सतिश शिंदे, महादेव शिंदे, दत्ता कांबळे, औदुंबर रेखावार, व्यंकटी सावकार,परिक्षित ठाकूर, मच्छीद्र कसबे,राम कसबे अवधूत खडके हे असुन राममंदिर महिला भजनी मंडळ, सावतामाळी महिला भजनी मंडळ,वटसिद्ध नागनाथ महिला भजनी मंडळ, हनुमान महिला भजनी मंडळ हे साथ देत आहेत शनिवारी सहा एप्रिल रोजी या यज्ञाची सांगता होणार आहे तरी या धार्मिक कार्य क्रमाचा लाभ घेण्याचे हनुमान मंडळाने आवाहन केले आहे

### विवेक वर्धिनी महाविद्यालयात परीक्षा सुरळीत सुरू

देवणी प्रतिनिधी- देवणी येथील विवेक वर्धिनी महाविद्यालयात पदवी परीक्षेचे केंद्र असल्याने या महाविद्यालयात बीकॉम बीएससी बीसीए शाखेचे विद्यार्थी परीक्षा देत आहेत. या महाविद्यालयात रसिका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत उन्हाळी परीक्षेचे परीक्षा केंद्र आहे. या परीक्षा केंद्रावर ४६५ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. गेल्या २४ वर्षापासून या महाविद्यालयास परीक्षा केंद्र आहे. या परीक्षा केंद्रासाठी केंद्रप्रमुख म्हणून प्राध्यापक भालके एस व्ही. एसीएस म्हणून प्राध्यापक फावडे आर आर. प्राचार्य डॉक्टर रामरतन शिंदे क्लार्क म्हणून प्रमोद लासोने, बालाजी सोनकांबळे महादेव बिजापुरे माने प्रभाकर दीपक कांबळे उद्धव इंगोले सर्व प्राध्यापक कर्मचारी या परीक्षा केंद्रावर सहकार्य करीत आहेत. परीक्षा केंद्रावर विद्यापीठाचे दक्षता पथक कार्यरत आहे

# घोणसी गावात पोवाडा व पथनाट्यामधून मतदार जनजागृती कार्यक्रम संपन्न



उदगीर-लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ , ४१ - लातूर लोकसभा मतदारसंघ (अ.जा.),२३७ - उदगीर विधानसभा मतदारसंघ (अ.जा.) अंतर्गत मा. वर्षा ठाकूर (घुगे) मॅडम, जिल्हाधिकारी महोदया लातूर, मा. सुशांत शिंदे साहेब उपविभागीय अधिकारी उदगीर, सौ.सुरेखा स्वामी मॅडम, तहसिलदार जळकोट यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक ०५/०४/२०२४ वार शुक्रवारी वेळ सायंकाळी ७ वाजता जळकोट तालुक्यातील घोणसी महसूल मंडळामध्ये घोणसी येथे पोवाडा व पथनाट्य कार्यक्रमाच्या माध्यमातुन लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ या नियोजीत दिनांक ७ मे २०२४ रोजी १००% मतदान करण्याबाबत मतदारांना आवहान करण्यात आले .

मतदार जनजागृती करण्यात आली.आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नवीन तरुण मतदारामध्ये मतदानाचे महत्व व लोकशाही बळकटी करणाचे बाळकडु पोवाडा व पथनाटयामधील कलाकार शाहीर बळीराम घोगरे व त्यांचा संच यांच्या कलेतुन जागृती करण्यात आली. यावेळी तहसिलदार जळकोट सौ.सुरेखा स्वामी मॅडम नायब तहसिलदार संतोष गुट्टे व गोविंद खरात ,मंडळ अधिकारी राजेंद्र कांबळे घोणसी मंडळ अंतर्गत तलाठी अनिल उमाटे तलाठी सज्जा घोणसी, अतिक शेख,सुरज भिसे तलाठी,आकाश पवार,माधव कवडेकर व सरपंच शरद कोकणे,पोलीस पाटील सोमेश्र्वर परगे,चेरमन ज्ञानोबा मालुसरे, तंटामुक्ती अध्यक्ष दत्ता बिरादार सर्व ग्राम पंचायत सदस्य घोणसी तसेच सर्व ग्रामस्थ घोणसी दिपक आब्रे, प्रभाकर गणूचे, संभाजी आब्रे, बाबुराव परगे, सूर्यकांत मालुसरे, राहुल बिरादार,आनंद बिरादार, अनिल जानतिने, राहुल मालुसरे ,राहूल डावळे व महसुल मंडळातील परिसरातील जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# भीम मोहत्सवच्या अध्यक्षपदी बाबासाहेब सुर्यवंशी



उदगीर / प्रतिनिधी- भीमोत्सव २०२४ च्या जयंती समितीची बैठक मनोहर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील घेण्यात आली. यावेळी विविध उपक्रम राबविण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली असून यंदाच्या भीमोत्सवच्या अध्यक्षपदी बाबासाहेब सुर्यवंशी यांची निवड करण्यात आली.

प्रतीवर्षा प्रमाणे यंदाही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी भीमोत्सव समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी मनोहर गायकवाड, मारोतीराव तलवाडकर, दशरथ वाघमारे, संग्राम गडकर, सुनिल गोडबोले आदींची उपस्थित होते. यावेळी भीमोत्सव २०२४ ची कार्यकारणी निवडण्यात अली. अध्यक्षपदी बाबासाहेब सुर्यवंशी यांची तर उपाध्यक्ष सुनील गोडबोले,सचिव मनोहर गायकवाड, सहसचिव संग्राम गडकर, कोषाध्यक्ष मारोतीराव तलवाडकर, सदस्य म्हणून दशरथ वाघमारे, बाबासाहेब कांबळे, रोहित चव्हाण, सिध्दार्थ सोनकांबळे, अमोल सुर्यवंशी, दिपक सुळकेकर आदींची निवड करण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

दि. .०३/०४/२०२४

लातूर जिल्ह्यातील तथा विशेषतः उदगीर नगर पालिका हद्दीमधील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वार सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार श्री अजय प्रल्हाद मलगे व्यवसाय शेती व व्यापार रा. उदगीर जि. लातूर यांनी सांगितल्यावरून दिलेल्या माहितीवरून व दाखवलेल्या कागदपत्रावरून आणि अधिकृत केल्यावरून सर्वांच्या माहितीसाठी जाहीर प्रगटन प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

आमचे पक्षकार यांनी उदगीर येथील प्लॉट क. २७ सर्वोदय सहकारी हाउसिंग सोसायटी, उदगीर येथील घर जागा ज्याचा मिळकत नगर परिषद क. ३-२-२३९/३-२-१०५७ याबाबत लातूर येथील को. ऑप. कोर्ट या न्यायालयात दि.दा.सी.सी.क. १७२/२०२० दाखल केला असून सदरील प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. सदरील घर जागेची चतुर्सिमा खालीलप्रमाणे आहे. पुर्वेस : ३० फुटाचा रस्ता, पश्र्चिमेस आनंद नगर, दक्षिणेस रावीकर यांचा प्लॉट क. २६, उत्तरेस मुक्कावार यांचा प्लॉट क. २८

येणेप्रमाणे वरील चतुर्सिमेच्या आतील घर जागेचे मालक श्री अजय प्रल्हाद मलगे असून करारनामा, पैसे भरल्याची पावती, संमतीपत्रक, प्लॉट वर्गीकरण पत्र, सदस्य होण्याचा अर्ज सभासद नोंदणी व भाग खरेदी अर्ज, भाग हस्तांतर पत्र कराची पावती, एन.ए. कर भरल्याची पावती इ. कागदपत्र त्यांचे हक्कात असून असे ऐकीवात येत आहे की, काही व्यक्ती वरील नमुद मिळकतीबाबत व्यवहार करण्याच्या प्रयत्नात आहेत. तरी या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, कोणीही व्यक्तीनी वरील नमुद मिळकतीबाबत

हस्तांतर व्यवहार करू नये तसे केल्यास संबंधीत व्यक्ती जबाबदार राहतील व त्याच्या होणाऱ्या खर्चास व परिणामास ते स्वतः जबाबदार राहतील. सदरील प्रकरणात अजय प्रल्हाद मलगे यांनी खालील व्यक्तींना प्रतिवादी केले असून त्यांची नावे १. अर्जुन मारोती वट्टमवार मयत चे वारसदार राहुल अर्जुन वट्टमवार, मंगेश अर्जुन वट्टमवार, अंजली अर्जुन वट्टमवार, रंगनाथ मारोती वट्टमवार, नारायण मारोती वट्टमवार, आशालता विठ्ठलराव चिंते, इंदिराबाई लक्ष्मणराव गंजेवार, सेक्रेटरी सर्वोदय को. ऑप. हाउसिंग सोसायटी हे असून सदरील प्रकरणात पुढील तारीख दि. ०८.०४.२०२४ ही ठेवण्यात आली आहे. सबब हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीस देण्यात येते.

दि..०३/०४/२०२४

जाहीर प्रगटन देणार
अजय प्रल्हाद मलगे
प्लॉट क. २७, सर्वोदय सह.
हाउसिंग सोसायटी
लि. उदगीर ता. उदगीर

तर्फे
ॲड. एल. एस. मध्वरे
जि. लातूर उदगीर

# सौ.सविता कोळसे पाटिल यांना राज्यस्तरीय पुरस्कार



उदगीर / प्रतिनिधी- पुलंच्या एका संग्रहातील ओळी आहेत-- विश्र्व निर्माण करणं म्हणजे ...नातीगोती जपणं.. छंद जोपासणं...पाहुणे होऊन जाणं... खूप गप्पा मारणं... घराच्या उंबऱ्यात चपलांचा ढीग असणं... खळखळून हसणं... काळजातील दुःख सांगून मोकळेपणा रडणं... या गोष्टी प्राप्त करून घेणारी व्यक्ती... म्हणजे शून्यातून विश्र्व निर्माण करणारी व्यक्ती अशा शून्यातून स्वतः मानसिक सामाजिक विश्र्व निर्माण करणाऱ्या सोनंद गावच्या बचत गट प्रवर्तक कार्यकर्त्या सावित्रीबाई फुले प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य श्री महादेव दिगंबर कोळसे पाटील यांच्या सुविद्य पत्नी सौ सविता महादेव कोळसे पाटील. यांना नुकताच अविष्कार सोशल अँड एज्युकेशनल फाउंडेशन तर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला.

दिनांक २९ मार्च रोजी वितरण सोहळा सोलापूर येथे पार पडला .प्रबळ इच्छाशक्ती व कष्टाची तयारी असेल तर प्रत्येकीला यश प्राप्त होते पूर्वाश्रमीच्या कुमारी सविता व्यंकटराव पाटील हिप्पळगावकर त्यांचे वडील शिक्षक यांच्याकडून त्यांना समाजकार्याचा वारसा लाभला. गावात रात्र शाळा चालवणे, सगळ्यांना शिक्षित करणे, वाचनालय काढून घरोघरी महिलांना पुस्तके देऊन वाचनाची आवड निर्माण करणे, ग्राम स्वच्छता, पिण्याचे पाणी देणे या त्यांच्या कार्याचा वारसा त्यांनी आपल्या मुलीला दिला व सौ सविता यांनी तो चालू ठेवला आहे.परिसरातील महिलांसाठी त्यांच्या विकासासाठी त्यांनी तो पुढे चालवला आहे .गेली २५ वर्ष त्यांनी बचत गटाच्या माध्यमातून अनेक महिलांचे छोटे व्यवसाय शेतीच्या कामासाठी घर बांधणी पासून मशीन देणे मुलांच्या फी पासून ते लग्न खर्चापर्यंत पैसे उपलब्ध करून त्यांचे आयुष्य सुखकर केले आहे.त्यांच्या प्रापंचिक चिंता मिटवण्यास हातभार लावला आहे हे करताना त्यांनी कधी थकबाकी मोजायची सोडली तर कधी सावकारी व्याज चढवले नाही.स्वयंशिस्त व रोखठोक बोलण्याने गटातील व्यवहार अबाधित ठेवून सोबत प्रेमाचा बचतीचा ,हातभाराचा सहकार्याचा सल्ला देऊन महिलांमध्ये आत्मविश्र्वास निर्माण केला.आरोग्यविषयक जागृती मनोरंजन अनेक समारंभ केले. चालू वर्षीच त्यांना माता बालक प्रतिष्ठान तर्फे दिला जाणारा जिद्द पुरस्कार देऊनही प्रतिष्ठानने त्यांचा सन्मान केला. सोनंद ग्रामपंचायत तर्फे ही सरपंच श्री समाधान पाटील व सर्व सदस्यांनी त्यांना अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित केले आहे. जिंकल्यावर शाब्बासकी देणाऱ्या हातांच्या गर्दी पेक्षा खेळात उतरताना अगोदर विश्र्वासाने पाठीवर ठेवलेला हात किमती असतो. त्यांचे यजमान श्री महादेव कोळसे पाटील यांचाही हात व मोठे सहकार्य त्यांच्या या कार्यात आहे. नाते सन्मानित करणारेअसावे .प्रेरणा देणारे असावे.

बळ देणारे साथ देणारे असावे. स्वार्थ पाहणारे नसावे असे आचरण व कृतीतून त्यांनी दाखवून दिले व समस्त महिलांपुढे एक आदर्श घालून दिला त्याबद्दल त्यांचे मनस्वी अभिनंदन करावेसे वाटते. त्या उच्चशिक्षित आहेत धन्वंतरी म्हणजेच आरोग्य देवता त्यांच्यावर इतकी प्रसन्न नाही. परंतु ,आरोग्य संपन्न नसल्याची कसलीही खंत त्यांच्या व्यक्तित्वात कधी दिसली नाही. म्हणून त्यांच्यासाठी काही कवी विंदा करंदीकर च्या ओळी आठवतात ...विंदा लिहितात.. आयुष्याला द्यावे उत्तर ..नको गुलामी नक्षत्रांची ,भीती आंधळी ताऱ्यांची, आयुष्याला भिडतानाही चैन करावी स्वप्नांची.. त्यांच्या साऱ्या स्वप्नांना गगनभरारी लाभो अशी ईश्र्वरचरणी प्रार्थना! व त्यांच्या कार्य व सन्मानाला मनःपूर्वक आभाळभर शुभेच्छा ! अभिवादन ! या अभिवादनाबरोबरच सोनंद व परिसरातील सर्व महिलांना माझे मनःपूर्वक आवाहन आहे आपणही बचत गटांमध्ये सामील होऊन स्वतःचे व्यक्तिमत्व , संसार फुलविण्यास सिद्ध व्हावे प्राचार्या श्रीमती संगीता दत्तात्रय शेडसाळे. सावित्रीबाई फुले प्रशाला व ज्युनियर कॉलेज सोनंद तालुका सांगोला जिल्हा सोलापूर.

# तलावावरील १०० मीटर पर्यतच्या मोटारी बंद करुन कार्यवाही करा : तहसीलदार स्वामी



**माधव होनराव**

जळकोट : तालुक्यातील अनेक गावात पाणीटंचाई सुरु झाली असून अनेक गावातून अधिगृहण व टँकरची मागणी वाढत आहे. साठवण तलावावरील शंभर मीटर पर्यत मोटारी जप्त करुन कार्यवाही करण्याचे आदेश तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी ता. ५ मार्च रोजी तहसील कार्यालयातील सभागृहात मंडाळाधिकारी, तलाठी, पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी, ग्रामसेवक, सरपंच यांच्या पाणीपुरवठा आयोजन बैठकीत सुचना देण्यात आल्या.

पुढे बोलताना तहसीलदार स्वामी यांनी उन्हाची तीव्रता दिवसेदिवस वाढत असल्याने साठवण तलाव, बोअर,विहीरीची पाणी पातळी खालवत असून यांचा फटका अनेक गावच्या पाणीपुरवठ्याला होत आहे .साठवण तलावातील पाणी उपसा बंद करा, असे आवाहन करुन काही शेतकरी रात्री उशिरा पाणी उपसा करत आहेत. त्यामुळे आशाची गय करु नका. तलावावर मोटारी आढळून आल्यास जप्त करुन कार्यवाही करा. त्याचबरोबर हातपंपाच्या पाण्याची पातळी घटत असल्याने तेथे पईपे टाकून वाढून घेऊन त्यांची दुरुस्ती करा. प्रत्येक गावात पाणी उपलब्ध करावयाच्या उपाययोजना याबाबत तहसीलदार गावनिहाय आढावा घेतल्यानंतर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना सुचना देऊन पाणीटंचाई बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सुचना दिल्या.

त्याचबरोबर प्रलंबित पाणी पुरवठा विषयक कामे तात्काळ पूर्ण करून घेणे, शिल्लक तलावातील पाणी साठा जतन करणे, तलावापासून ५०० मीटरच्या आतील सर्व खासगी स्त्रोत देखील शंभर टक्के बंद करणे बाबत सूचना देण्यात आल्या. गाव निहाय किती दिवस पाणी पुरवठा होईल आणि पुढे कोणत्या उपाय योजना कराव्या लागतील याबाबत सरपंच, ग्रामसेवक आणि तलाठी यांच्या सोबत चर्चा करून येणाऱ्या काळात पाणी टंचाईच्या झळा कशा कमी होतील यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.तालुक्यातील सर्व नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करण्याचे आवाहन बैठकीत करण्यात आले.

या बैठकीला तहसिलदार सुरेखा स्वामी, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, जि. प. पाणी पुरवठा अधिकारी स्वामी, मंडळाधिकारी कमलाकर पन्हाळे, तलाठी विश्र्वास धुप्पे आदी उपस्थित होते.



# मा.आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांची सांत्वनपर भेट

येरोळ : येथील दोन सख्खे भाऊ पुणे येथुन मोटार सायकलवर गावी येताना पवन महालिंग शिंदाळकर २८ आणि सुधीर महालिंग शिंदाळकर यांचे चार दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले. या दुःखद प्रसंगी महालिंग सिंदाळकर यांच्या निवास्थानी आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सात्वनपर भेट देऊन सिंदाळकर कुटुंबियांचे सांत्वन केले. त्यांच्या समेवत भाजपाचे तालुका अध्यक्ष मगेंश पाटील, मा.सभापती शामराव सिंदाळकर, आमर माडजे पाटील, उपसरपंच सतिस सिंदाळकर उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर लिंगायत सेवाभावी मंडळ (रजि.)चु सदस्य नोंदनी सुरु

उदगीर (प्रतीनीधी)- महात्मा बसवेश्वर लिंगायत सेवाभावी मंडळ ( रजि.) उदगीर या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची बैठक संपन्न. या बैठकीत नवीन सभासद करून घेण्याचे ठरले आहे.

महात्मा बसवेश्र्वर लिंगायत सेवाभावी मंडळ ( रजि.) ही संस्था धार्मिक व सामाजिक कार्य करण्यास सहकार्य करते.. व समाजात महात्मा बसवेश्र्वर यांचे बसव तत्त्व व शिवयोगी मन्मथ स्वामी यांचे तत्त्वावर आधारित संबोधित करते. जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर व शिवयोगी मन्मथ स्वामी यांच्या कार्याचे रक्षण करून सामाजिक एकता जोपासण्याचे काम केले जाते..

जास्तीत-जास्त लोकांनी सदर मंडळाचे सदस्य होऊन सहभाग घ्यावा असे आवाह महात्मा बसवेश्र्वर लिंगायत सेवाभावी मंडळाचे अध्यक्ष मनोहरराव पाटील भोपणीकर सचिव हणमंतराव औरादे यांनी केले आहे.